प्रकरण पाचवे

मातंगांचे सामाजिक व राजकीय संघटन

प्रकरण पाचवे
मातंगांचे सामाजिक व राजकीय संघटन

- प्रस्तावना
- संघटनेची आवश्यकता/महत्त्व
- संघटनेचा अर्थ
- मातंग समुदायास वेगळ्या संघटनेची गरज का?
  १. जातीय संघटना, चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी
  २. डॉ. आंबेडकरपूर्व काळ
  ३. डॉ. आंबेडकर काळ
  ४. डॉ. आंबेडकरोत्तर काळ
  ५. आंबेडकरी चळवळ व मातंग समुदाय
- प्रदेशवार मातंग जाती संघटना
  १. पश्चिम महाराष्ट्रातील मातंग समुदाय संघटना
  २. विदर्भातील मातंग समुदाय संघटना
  ३. मराठवाड्यातील मातंग समुदाय संघटना
  ४. खान्देशातील मातंग समुदाय संघटना
- सामाजिक संघटनेची परिणामकारकता व उपयोगिता
- संघटना, चळवळींतील उणीवा
- सारांश

५.१ प्रस्तावना (Introduction) :

महाराष्ट्रातील दलित स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सामाजिक व राजकीय चळवळीच्या व संघटन निर्मितीच्या दृष्टीने अग्रेसर आहेत. अशी सर्वसाधारण समज झालेली दिसून येते. परंतु ती वस्तुस्थिती नाही. मातंगांमध्ये चळवळी अथवा संघटन दिसून येत नाही. म्हणून ते आपले व आपल्या प्रश्नाच्या अनुषंगाने राजकीय करण करू शकलेले नाहीत. परंतू १९८० नंतर मातंग समुदायात चळवळी व संघटन उभे राहताना व या संघटना स्वतंत्ररीत्या आपल्या समुदायांच्या न्याय्य-हक्कासाठी लढा देतांना दिसतात.

म्हणून प्रस्तुत प्रकरणात हिंदू दलितांची संघटना नेमकी काय आहे? ती महाराष्ट्राच्या कोणत्या भागात विखुरलेली आहे, संघटनेच्या रास्त मागण्या व भूमिका काय आहेत ? इत्यादी प्रश्नांची चर्चा आपण प्रस्तुत प्रकरणात करणार आहोत. या संदर्भाची तपशीलवार चर्चा करीत असताना जाती संघटनेचा ऐतिहासिक आढावा, आंबेडकरी चळवळ व मातंग समाज, चळवळींचा प्रवास, स्वरूप, अभ्यासकांचा दृष्टिकोन, महिला संघटना व नव-सामाजिक चळवळींचीही माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न राहणार आहे. जातीगटांच्या संघटना नेमक्या कोणत्या आधारावर आंदोलन करीत आहेत आणि त्या आंदोलनाची दिशा समाज परिवर्तनास साह्यभूत आहे काय? हिंदू दलितांची चळवळ एकलक्षी वा विकासलक्षी आहे का ? अशा दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

५.२ संघटनेचे महत्त्व/आवश्यकता :

मानवी जीवनाच्या कल्याणासाठी भारतीय संविधानात घटनात्मक तरतुदी केलेल्या असूनही प्रत्येक जाती- समूहाला, प्रत्येक गटाला आपल्या हक्कांची प्राप्ती होत नाही. तेव्हा तो समूह संघटनेच्या रूपाने शासनाशी लढा देत असतो, संघर्ष करीत असतो. संघटना हा अन्यायग्रस्त समूहांचा एक आवाज असतो, व्यासपीठ असते. व्यक्ती ही संघटनेत येऊन बोलका (*Vocal*) बनतो आणि विशिष्ट भूमिका संपन्न करतो. अशा स्वरूपांची भूमिका घेऊन मातंगांच्या सामाजिक व राजकीय संघटना कार्य करतांना दिसतात. खरेतर समाजातील कोणत्याही व्यक्तीला राज्य, राजकीय शक्ती व समाजातील संघर्ष यांच्या स्वरूपाचे ज्ञान करून घ्यावयाचे आहे. तिला समाजाची ठेवण, सामाजिक प्रक्रिया, संस्कृती, आर्थिक ढाचा व या सर्वांची परस्परांमधील जडणघडण यांचा अभ्यास करण्याशिवाय गत्यंतर नाही.[१] तेव्हा कुठे ती व्यक्ती सामाजिक संघटनेसंदर्भात भाष्य करून त्यासंबंधीचे विश्लेषण करू शकते. नाही तर अशी चर्चा अर्थहीन वा प्रगल्भहीनतेचे दर्शन घडविते.

५.३ संघटनेचा अर्थ:

संघटना या समाजाचा अतिमहत्त्वाचा एक अंतर्गत भाग असतात. म्हणून सामाजिक प्रश्नांसंदर्भात संघटना ताठर भूमिका घेताना दिसतात. सामाजिक संघटना या समाजाच्या प्रश्नांचे व्यवस्थित मांडणी करणारे एक व्यासपीठ आहे. ती मानवी घटक व वर्तवणुकीचा आदर करते. कारण ती मानवी जीवनाशी अधिक जवळ असते. म्हणून या संदर्भातील व्याख्या संघटनेचा नेमका अर्थ स्पष्ट करेल. संघटनेच्या संदर्भात सुव्यवस्थित विचार डायमंड सामाजिक ज्ञानकोशात आढळतो. ते पुढीलप्रमाणे उद्धृत करता येईल.

'संघटना ही एक व्यवस्था असते. तिच्याद्वारे तिच्या सभासदांचा परस्परसंबंध व त्यांच्यात घडून येणाऱ्या आंतरक्रिया निश्चित केल्या जातात. त्यामुळे संघटनेची एक विशिष्ट रचना व कार्यपद्धती तयार होते. अशा पद्धतीच्या संघटना समाजाच्या वेगवेगळ्या गटांमध्ये त्या गटांचे विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी स्थापन होत असतात. संघटनेच्या माध्यमातून त्या गटातील हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न केले जातात. म्हणून समाजात वेगवेगळ्या संघटना दिसून येतात. समाजाच्या बदलत्या परिस्थितीनुसार या संघटनांचे स्वरूप व कार्यपद्धतीही बदलते. या परिवर्तनाच्या प्रक्रियेत काही संघटना नामशेष होतात किंवा नवीन स्वरूप धारण करतात. त्याचबरोबर नव्या संघटनांचाही उदय होत असतो. समूह करून राहणाऱ्या मानवी सहज प्रवृत्तीतून या संघटनांचा आविष्कार होतो. राजकीय व्यवस्थेत अशा प्रकारच्या विविध संघटना कार्यरत असतात. यातील काही संघटना दबाव गटांची भूमिकादेखील पार पाडतात. अशा पद्धतीची संघटनात्मक विविधता लोकशाही व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात आढळून येते. या संघटनेतील संघटन कौशल्यावरच तिचे यश अवलंबून असते. संघटनेचे नेतृत्व करणारा प्रमुख व इतर सभासद यांच्यातील संबंध, त्यांची कार्यक्षमता, संघटनेप्रती असलेली त्यांची बांधीलकी यावरून या संघटनेची यशस्विता निश्चित होते.[२]

> जे.पी. नेट्टीच्या मते, जनसंघटन हे बंधनयुक्त कृती (*Commitment to Action*) किंवा वर्तवणुकीच्या निरीक्षणात बंधनयुक्त रूपांतर वा बदल आहे. तसेच या संकल्पनेत मूल्य व उद्देशांचे अस्तित्व असते. तात्पर्य, राजकीय जनसंघटन ही एक महत्त्वाची विचारप्रणाली असून तिचा अनेकांगी विचार केला जातो (पाहा- वसंत पवार, पीएच.डी. प्रबंध, डिसेंबर २००४, पृष्ठ क्र. ३२-३३). तात्पर्य असे की, लोकांनी एकत्रित कार्य करणे म्हणजे संघटना होय. जी राजकीयदृष्ट्या अधिक परिपक्व होताना दिसते आणि राजकीय लाभ घेताना दिसते.

In Expressing it's public interest in organisations matter, a legislatore tends to be concerned with several

common problems. These arise in the context of many different policies and programmes of Government, at the fedral, state, or local level.[3]

आजच्या परिप्रेक्ष्यात एकीकडे जागतिकीकरण, भ्रष्टाचार, फोफावलेला मूलतत्त्ववाद तर दुसरीकडे अल्पभूधारक, भूमिहीन अशा अवस्थेत सर्वसामान्य नागरिक जीवन जगतो आहे. तेव्हा 'अन्याय घडो कोठेही, पेटून उठू आम्ही' ही नव्या युगातील प्रत्येक चळवळीची तत्त्वप्रणाली असावी. यातूनच चळवळ गतिमान होते. मुख्यत्वे दलित चळवळ स्वतंत्र असली तरी सामुदायिक प्रश्नांना घेऊन लढणारी आहे; पण दलित समाजाला मध्यमवर्गीय चळवळ मागून का फरफटावे लागते?[४] हा प्रश्नही एका अर्थाने महत्त्वाचा आहे.

संघटनेत वा चळवळीत कार्य करणाऱ्या पूर्ण वेळ कार्यकर्त्याला वैयक्तिक आकांक्षा बाळगता येत नाहीत. समूहाच्या म्हणून ज्या काही आकांक्षा असतील, त्याच त्याच्या आकांक्षा असल्या पाहिजेत. म्हणून संघटनेचा एक गुण अतिशय महत्त्वाचा आहे; तो म्हणजे 'सामुदायिक कल्याण' यासाठी संघटना कार्यतत्पर असते. संघटना या मानवी हक्कांच्या प्राप्तीकरिता लढे देताना दिसतात. जे लोकसमूह संघटनेत नाहीत; पण संघटनेने केलेल्या संघर्षाचे लाभ घेताना दिसतात ही वस्तुस्थिती आहे. आज मानवी जीवनाच्या मूलभूत गरजा, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक या क्षेत्रातील संधी, समानता या संदर्भात संघटनेची भूमिका लक्षात घेण्याजोगी आहे.

एकंदरीतपणे संघटना स्थापन झाली म्हणजे चळवळ होतेच असे नाही; पण बहुतांश चळवळी या संथगतीने वाटचाल करताना दिसतात. 'दलित पँथर'नंतर व्यापक प्रमाणावर लढणारी वा आक्रमक असणाऱ्या संघटना दिसत नाहीत. म्हणून चळवळ करण्याची गरज प्रतिपादन करणारा *Andre Beteille* चे विधान उद्‌बोधक स्वरूपाचे वाटते. ते असे की :

The reality of rigid social stratification makes itself felt in the daily lives of the poor and the oppressed in general, and the untouchables in particuler. The Problem of the backward classes is, in its most general from, the problems of achieving equality in a world permeated by inequality.[5]

उपरोक्त विधानातून चळवळ करण्याची कल्पना वा गरज लक्षात येते. सामाजिक चळवळीचा सुधारित अर्थ प्रस्तुत करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. यात रूडॉल्फ (१९७१), जोसेफ गुडफिल्ड (१९७०), नॉर्मन फ. कान्टर (१९७०), एम.एस. गोरे (१९७१), सतीश अरोरा (१९७१), मॅथ्यू जोसेफ (१९७०), ॲलन मार्श (१९७७),

सुनंदा पटवर्धन (१९७३) इत्यादींची भूमिका परंपरागत सामाजिक आदेशात बदल व्हावा आणि आधुनिक विचारप्रवाह पुढे यावा या दृष्टीने महत्त्वपूर्ण वाटते. या कामी विविध जनसंघटना सकारात्मक भूमिका पार पाडतील, अशी अपेक्षा यात अंतर्भूत आहे. उपरोक्तांनी घेतलेली भूमिका अशी आहे की, सामाजिक-राजकीय चळवळी निषेधाची किंवा पुनरुज्जीवनाची चळवळ आहे. यावरून राजकीय चळवळींच्या प्रक्रियेत संघटनांची भूमिका महत्त्वाची आढळून येते. संघटना हे असंतोषाचे, निराशावादी, पिळवणूक झालेल्या व्यक्तींना परिपूर्ण समाधान प्राप्त करून देण्याचे एक महत्त्वाचे साधन बनले आहे.[६] मागील चर्चेप्रमाणे संघटनेला विचारप्रणालीचा एक अंग असतो. विचारप्रणाली संघटनेच्या प्रक्रियेत मुख्य विचार वा मुद्दे पुरवीत असते. म्हणूनच कार्ल मार्क्स या जर्मन तत्त्वेवेत्याने न्यायपूर्ण लोकांच्या संघटनेची निर्मितीची गरज प्रतिपादन केली आहे. कोणत्याही संघटनेची विचारप्रणाली ही न्यायपूर्ण असून ती स्वाभाविकपणे हिंसक, सैनिकी आणि क्रांतिकारी असते. म्हणून 'वॉटकिंग फ्रेडरिकने' विचारप्रणाली ही साध्या संकल्पनेवर उभी असावी अशी सूचना केली आहे.[७]

तात्पर्य, असे की कोणत्याही स्वरूपाची संघटना ही आपल्या मागण्यांसाठी न्यायपूर्ण मार्गाचा अवलंब करते. पण कधी हक्कांच्या प्राप्तीसाठी मोठ्या प्रमाणावर संघर्ष करतानाही दिसते. उदा-महाराष्ट्रात नामांतरासाठी दलित पँथरचा लढा व दादासाहेब गायकवाड यांचे भूमिहीन आंदोलन. याचप्रमाणे सन २००७ मधील राजस्थानातील गुर्जर समाज आंदोलन महत्त्वपूर्ण वाटते. याच अनुषंगाने संघटना कार्यरत असतात. त्यांचा मार्ग जरी चुकला, तरी त्यांच्या मागण्या रास्त आहेत. म्हणूनच संघटनेची गरज वा आवश्यकता आजच्या परिप्रेक्ष्यात काळाची गरज वाटते.

संघटना ही चळवळीच्या रूपाने समाजात अग्रेसर असते. संघटनेशिवाय चळवळीची कल्पना करता येत नाही. म्हणून संघटना या अर्थाने समाज परिवर्तनाचे साधन ठरतात. या संदर्भाचे अध्ययन अनेकांनी केलेले आहे. महाराष्ट्रात अनेक चळवळी आढळतात. यात प्रामुख्याने शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, दलित चळवळ, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, मुस्लिम सत्यशोधक चळवळ, स्त्री-मुक्ती चळवळ, सर्वोदय चळवळ आदी यांपैकी महाराष्ट्रातील ग्रामीण चळवळींचा अभ्यास करणारे लेखक म्हणजे जी. परूळेकर (१९७५), गेल ऑमव्हेट (१९७३), अशोक उपाध्याय (१९७९,१९८०) यांनी विभागवार चळवळींचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. त्यात ग्रामीण चळवळीचे वेगवेगळ्या मुद्यांवर झालेले विश्लेषण आढळते.''[८]

याचप्रमाणे व्हर्बा, अहमद व भट्ट (१९७३) यांनी अमेरिकेतील व भारतातील अनुक्रमे कृष्णवर्णीय व हरिजन यांचा केलेला अभ्यास या समाजाच्या चळवळीचे

तुलनात्मक चित्र रेखाटतो. हरिजनांच्या चळवळीसंबंधी बोलताना हा अभ्यास महाराष्ट्रातील डॉ. आंबेडकरांच्या चळवळीशी मुख्यत्वे संबंधित आहे.

तात्पर्य, प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास हा संघटनात्मक चळवळीशी संबंधित असल्याकारणाने चळवळ ही नेमकी काय आहे, तिचे स्वरूप कसे आहे, चळवळीचा प्रवास कसा झाला आहे यासंदर्भाचे अध्ययन होणे या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

५.४ मातंग समुदायास वेगळ्या संघटनेची गरज का?

स्वातंत्र्यापूर्व काळापासूनच मातंग समुदायाचे जे काही विविध प्रश्न होते, त्याकडे तत्कालीन वर्चस्ववादी समूहाने डोळेझाक केल्याचे दिसून येते. मातंग समुदाय हा अस्पृश्यांतील एक महत्त्वाचा दुसरा प्रभावी समुदाय म्हणून ओळखला जातो. परंतु ज्या प्रमाणे दलितांतील महार समुदाय सेवा व संधीचा लाभ घेऊन आक्रमकपणे पुढे आला व आपली सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक ओळख प्रस्थापित करू लागला. त्या प्रमाणे मातंग समुदायाला आपली ही ओळख प्रस्थापित करता आली नाही. खरे तर अस्पृश्यांतील एक जात असूनदेखील हा समुदाय मागास व उपेक्षित राहिला. आपले महार बांधव सभा/ परिषदा, शिक्षण व राजकीय जागृतीतून उन्नतीकडे सरकत आहेत. याप्रमाणे आपले ही काही प्रश्न आहेत व आपण स्वतंत्र आहोत. हे समजून मातंग नेतृत्त्वांनी आपली जातीगटांच्या संघटनात्मक निर्मितीला गती देण्याचा प्रयत्न केला. ही जाणीव १९८० नंतर मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. अस्तित्वात असलेल्या दलित चळवळी समग्र दलितांचे प्रश्न हाताळले नाहीत. म्हणून उपेक्षित मातंग समुदायाने महाराष्ट्राच्या विविध भागांत संघटना स्थापन केलेले दिसतात. एकंदरीत काही मुद्यांच्या आधारे या समुदायाच्या संघटनेची गरज लक्षात येते.

१.जातीय संघटना, चळवळींची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

चक्रधर-ज्ञानेश्वरकालीन भक्ति चळवळीपासून ते वसाहतकालीन समाज सुधारणा चळवळीपर्यन्त; सत्यशोधक, ब्राह्मणेतर, दलित चळवळीच्या सामाजिक न्यायासाठीच्या चळवळीपासून ते अगदी अलीकडील काळातील स्त्रिया, आदिवासी, शेतकरी वर्गाच्या सक्षमीकरणाच्या चळवळीपर्यंत; तसेच हिंदू, बहुजन आदी जनसमूहांच्या अस्मितादर्शी चळवळीपासून ते बिगर-शासकीय, स्वयंसेवी संघटनांच्या एक प्रश्नीलक्षी अथवा विकासलक्षी चळवळीपर्यन्त महाराष्ट्राला सामाजिक चळवळीचा प्रगल्भ वारसा लाभलेला आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये या चळवळीचे स्थान खूपच मोलाचे आहे. कारण या चळवळींनी प्रबोधनाच्या वाटा मोकळ्या केल्या. आधुनिकीकरणाची दिशा व आशय निर्धारित केला.

इंग्रजी भाषेत संशोधन व लेखन व्यवहार करणाऱ्या अभ्यासकांनी सामाजिक चळवळीच्या संदर्भात सैद्धांतिक व संकल्पनात्मक तसेच विश्लेषक आणि इतिहासपर अशा विविध बाजूंनी लेखन केलेले आहे. याचप्रमाणे थोड्या फार प्रमाणात सामाजिक शास्त्रज्ञांचे अभ्यासक व कार्यकर्ते यांच्याकडून संकीर्ण लेखन मराठीमध्ये प्रसंगोपात होत राहिले आहे. अशा सर्व व्यापक इतिहासाचा, वैविध्यपूर्ण साहित्याचा आढावा एका मर्यादित लेखनाच्या चतु:सीमेत घेणे म्हणजे विषयावर अन्याय करण्यासारखे आहे. म्हणून प्रस्तुत अध्ययनात आंबेडकर पूर्व, आंबेडकरयुग व आंबेडकरोत्तर काळातील सामाजिक संघटना, चळवळींचा अभ्यास करावयाचा आहे. तेव्हाच कुठे मुक्तिदायी राजकारणाच्या परिप्रेक्ष्यातून महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे (विशेषत: अस्पृश्य) स्वरूप व स्थान कोणते आहे ? हे समजण्यास मदत होईल. याच अंगाने मुख्यत्वे त्यांचा विचार करावयाचा आहे. तसेच या चळवळी कोणत्या मूल्यांना व राजकीय प्रक्रियेस प्रवर्तीत करीत आहेत आणि विद्यमान राजकीय व्यवस्थेवर त्यांचा काय परिणाम होत आहे याचा वेध घेण्याच्या उद्देशाने या चळवळींचा ऊहापोह प्रस्तुत अभ्यासात केलेला आहे.

२. आंबेडकरपूर्व काळ :

ब्रिटिश कालखंडात जाती संघटनांना असलेल्या सामाजिक सत्तेच्या आधारावर राजकीय नेतृत्व निर्मितीचा उगम झालेला दिसतो. 'यादव महासभा' (१९२४), 'नाडार महाजन संगम' (१९१०) या जातीय संघटनांनी भावनिक आधारावर जातीतील लोकांना संघटित करण्याचे कार्य करून शैक्षणिक व आर्थिक प्रगतीतून राजकीय सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न केला.

याच काळात अस्पृश्यांच्या उद्धारासाठी गोपाळबाबा वलंगकरांनी अस्पृश्यतेच्या पिळवणुकीविरुद्ध आवाज उठविला. त्यांनी 'अनार्यदोष परिहारक समाज' संघटना निर्माण करून अस्पृश्यता निर्मूलनासाठी 'भजन' व 'कीर्तन' याद्वारे जनसंघटन उभे केले. याप्रमाणेच 'शूद्रक' व 'दीनबंधू' या मराठी वृत्तपत्रांतून आपले विचार प्रकट केले.[९] यांचे विचार लक्षात घेऊन १९,२० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी यांचा आत्मीयतेने उल्लेख केलेला होता असा संदर्भ 'दीनबंधूच्या' जुन्या फाइल्समध्ये आढळतो. याचप्रमाणे शिवराम ज्ञानबा कांबळे यांनी १९०३ मध्ये सासवड (पुणे) येथे ५१ गावांतील महारांची सभा (महार सभा व सोमवंशीय सभा) भरवून अस्पृश्यांना लष्करात व पोलिसांत नोकऱ्या मिळाव्यात, असा अर्ज सरकारकडे केला. त्यांनी 'श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज' (१९०४) या संघटनेची स्थापना केली.[१०]

'Shri Sacchidanand Library (१९०८) या मराठी मासिकात सामाजिक, आर्थिक, धार्मिक प्रश्नांच्या निर्मूलनासाठी विचार प्रकट होत असत. तर दुसरीकडे अशा स्वरूपाचे प्रयत्न किसन बनसोडे, गणेश अक्काजी गवई, कालिचरण

नंदा गवळी या मध्य प्रांत, वऱ्हाडातील त्रिमूर्तींनी अस्पृश्यांच्या उत्थानाचे प्रयत्न केले. अशा स्वरूपाचे प्रयत्न आंबेडकरपूर्व काळात दिसून झालेले येते. पण मातंगाचा जाति संघटना व त्यांचा विकास झालेला आढळत नाही. म्हणून या काळातील दलित चळवळ सर्वव्यापक आढळत नाही. या काळखंडात मातंगांच्या प्रश्नांचे चिंतन व संघटनात्मक राजकारणाचा अभाव दिसून येतो. ज्या संघटना अस्तित्त्वात होत्या त्यांनी मातंग व तत्सम जातींचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर चर्चेला घेतले नाहीत. तात्पर्य, उपरोक्त विचारकार्यातूनच आंबेडकर युग प्रभावित होऊन समाज परिवर्तनासाठी अधिक प्रगल्भ झाले.

३. डॉ.आंबेडकर युग :

उपरोक्त चर्चेत आपण डॉ आंबेडकरपूर्वकालीन चळवळी, संघटना या संदर्भात चर्चा केलेली आहे. चळवळी या वेगवेगळ्या कारणांसाठी निर्माण होतात. काही चळवळी विषमतावादी रूढी, परंपरांचा विध्वंस करण्यासाठी निर्माण होतात. डॉ. आंबेडकरांचा काळ हा या दृष्टीने विशेष महत्त्वाचा मानला जातो. खरे तर दलित चळवळीला नवा चेहरा, प्रगल्भता डॉ.आंबेडकरांनीच प्राप्त करून दिली. आंबेडकरी चळवळ अर्थात दलित चळवळ ही सामान्यपणे १९२० पासून सुरू झाली आणि १९५६ पर्यत मोठ्या कष्टाने वाटचाल करीत राहिली. या चळवळीच्या पाठीमागे डॉ. आंबेडकरांचे जीवनदर्शन होते (विलास वाघ (संपा.) : सुगावा, ऑगस्ट २००८ : ०२).

डॉ. आंबेडकराच्या काळातच ब्राह्मणेतर पक्ष (१२ डिसेंम्बर १९२०) पुणे येथे स्थापन झाला. या पक्षाची स्थापना मुंबई इलाख्याच्या राजकीय व सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल. या पक्षामुळे महाराष्ट्रात बहुजन विचार प्रसारित होण्यास मदत झाली. अशा परिप्रेक्ष्यातून डॉ.आंबेडकरांच्या विचाराला जनसंमती प्राप्त झाली. आंबेडकरांनी दलितांची स्वतंत्र ओळख करून दिली. हिंदुत्ववाद मूलग्राही सामाजिक परिवर्तन करू शकत नाही. म्हणून सामाजिक व्यवस्थेला जे मूलग्राही आव्हाने होती, ती दूर करण्याचा प्रयत्न डॉ.आंबेडकरांनी केला.[११]

डॉ.आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभा (१९२४), स्वतंत्र मजूर पक्ष (१९३६), शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन (१९४२) या संघटना, पक्षांतून सामाजिक उत्थानाचे परिपूर्ण प्रयत्न केले. या काळात डॉ.आंबेडकरांच्या विचार व प्रेरणेतून अकोट तालुका दलित परिषद' (१९३५), पश्चिम वऱ्हाड दलित कॉन्फरन्स (१९३८) अशा संस्थात्मक परिषदा संपन्न झाल्या आणि दलित निनाद (१९४७), दलित भारत (१९४७), मूकनायक (१९२०) जनता, बहिष्कृत भारत, समता, दलित सेवक ही दलितांची वृत्तपत्रे प्रकाशित झाली. बहुतांश वृत्तपत्रांचे संपादन डॉ. आंबेडकर स्वत: करीत असत.[१२] या वृत्तपत्रांतून सामाजिक विषमता, भेदभाव दूर करणारे लेखन अस्तित्वात आले. अशा विचार-प्रसारातून दलितांतर्गत जातींच्याही सभा, परिषदा झाल्या. त्यांनी डॉ.

आंबेडकरांच्या नेतृत्वाच्या पाठीमागे राहण्याचा निर्णय घेतला (पाहा – मुंबई ईलाखा मातंग परिषद, मुंबई).

परंतु सन १९३५ नंतरच्या काळात मोठ्या प्रमाणावर दलितांर्गत संघर्ष दिसून आला. या कालखंडातील दलितांना यश प्राप्त करता आले नाही. त्याचे एक कारण म्हणजे ते सामाजिक दर्जा व स्तरीकरणामुळे दु:खित होते; आणि भारतातील वर्चस्ववादी जातींनी त्यांना संधी दिली नाही. म्हणून दलितांना चळवळींचा आधार घ्यावा लागला.[१३]

एकंदरीत डॉ. आंबेडकरप्रणित दलित चळवळीचे तीन महत्त्वाचे मुद्दे होते. पहिला जातीअंताचा लढा दुसरा दलितांनी राज्यकर्ती जमात होणे, तिसरा भारत बौद्धमय करणे. उपरोक्त विचारात 'जातीअंताचा लढा' हा मुद्दा वगळला तर अन्य दोन मुद्दे त्या दृष्टीने गतिमान झालेले दिसतात. पण जातींच्या भेदभावातून आजही सवर्णांकडून अन्याय होत आहेत. त्यांची चर्चा आपण दुसऱ्या प्रकरणात विस्तृतपणे केलेली आहे. म्हणून दलित चळवळीचा बाह्य दृष्टीने जातिसंघर्षसुद्धा विचारात घ्यावा लागतो.[१४]

अंतर्गत दृष्टीनेही अध्ययन तत्कालीन परिप्रेक्ष्यात होणे महत्त्वाचे होते. पण तसे फारसे झाले नाही. म्हणून दलितांतगर्त असंतोषाची भावना विशिष्ट रूप धारण करीत होती. या वास्तवकडे डोळेझाक करता येत नाही. पण डॉ.आंबेडकरांच्या युगात दलित चळवळीची पायाभरणी झाली आणि त्यास प्रगल्भताही प्राप्त झाली. एकूणच याकाळात मातंग हे आंबेडकरांपासून दूर राहिले. यामागे सकट, वायदंडे व माटे यांचा डॉ. आंबडेकरांशी सतत संघर्ष होत राहिला म्हणून आंबेडकर चळवळ व मातंग समुदाय असे सरळ विभाजन झालेले दिसून येते. तसेच त्याप्रमाणे महार समुदायाने आपल्या न्याय्य हक्काकरिता चळवळी व पक्ष स्थापन करून प्रगतीचे राजकारण केले. त्याप्रमाणे असे राजकारण मातंग पुढाऱ्याला करता आले नाही. पण सकट, वायदंडे यांनी मातंग समुदायाचे प्रश्न उभे केले. सकटनी अस्पृश्य समाज समता संघ या नावाची संघटना स्थापन केली. एकंदरीत आपण मागास आहोत व आपणावर अन्याय होतो आहे. ही जाणीव मांतग समुदायात होत होती. त्यामुळे आंबेडकरोत्तर दलित संघटना व चळवळी अधिक विकसित होताना दिसतात. परंतु मातंग विजय, मातंग तलवार, मातंग बंधु हे अस्तित्वात असलेल्या नियतकालिक व पत्रकाची प्रसिद्धी व उल्लेख मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. तात्पर्य, डॉ.आंबेडकरांनी १९४७ मध्ये पुण्याच्या मांगवाड्यात सभा घेऊन, चांभारांचा एक गट जो की डॉ.आंबेडकरांना पक्षपाती समजायचा, त्यांच्यावरील पक्षपाती असल्याचे आरोप खोडून काढले. ही चळवळ सर्व *Suppressed* लोकांच्या उत्थानासाठी आहे असे त्यांनी ठामपणे सांगितले (डॉ.पी.जी. जोगदंड : **'नवता'**, ६-१२-०८ : मुंबई). यावरून डॉ.आंबेडकरांचा वैचारिक उदारारमतवादी दृष्टिकोन आपणापुढे स्पष्ट होतो.

४. डॉ. आंबेडकरोत्तर काळ :

स्वातंत्र्यानंतरच्या काळात विशेषत: पहिल्या दोन दशकांमध्ये सत्तानिरपेक्ष समाजसेवा म्हणजे सामाजिक कार्य व अशा सामाजिक कार्याला वाहिलेल्या व गती देणाऱ्या सेवाभावी चळवळी म्हणजे सामाजिक चळवळ असा एक विशिष्ट अर्थ सामाजिक चळवळींना प्राप्त झाला. परंतु महाराष्ट्राच्या अभिजन वर्तुळात मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नवमानवतावादाचा विचार विशेषत: पक्षविरहित लोकशाहीचा विचार काहींना भुरळ पाडीत होता. या सर्वांचा परिणाम असा झाला की, सामाजिक चळवळी म्हणजे सत्तानिरपेक्ष, विकासलक्ष्यी, सेवाभावी चळवळी असा एक विशिष्ट अर्थ त्यांना प्राप्त झाला. पण त्या प्रत्यक्षात तशा किती काळ राहिल्या. राहू शकल्या हा भाग अलाहिदा. त्यांची घोषित ही पक्षीय, निर्वाचनात्मक रूढ राजकारणापासून अंतर ठेवण्याची होती.[१५] परंतु अशा निर्भय व स्वच्छ विचार किती संघटनांनी आत्मसात केला हा खरा मूळ प्रश्न होय. त्याबाबत समाधानकारक उत्तर देता येत नाही. कारण स्वातंत्र्यानंतरच्या राजकारणात प्रत्येक संघटना, (काही अपवाद वगळता) पक्षाचे वाहक म्हणून कार्य करताना दिसते.

यातून दलित नेते व चळवळींची कॉंग्रेस शरणता, साम्यवादी पक्षांची संसद शरणता, हिंदुत्ववादी पक्ष व सघटनांची कुंठितावस्था व कार्यक्रमशून्यता अशा सर्वच घटकांवर तत्कालीन युवक उद्विग्न झाला होता. तथापि, स्वातंत्र्योत्तर कालखंडात डॉ.आंबेडकरांच्या स्वप्नपूर्तीचा एक प्रयत्न म्हणून आर.पी.आय. (१९५७) हा पक्ष व दलित पँथर (१९७७) ही संघटना उदयास आली. त्यामुळे दलित चळवळीत एका प्रकारची जागृती झाली. आपल्या न्याय्य-हक्कांचे व्यासपीठ म्हणून दलित त्यांच्याकडे आशेने पाहत असत. या दृष्टीने दलित पँथरने कार्य केले. नामांतर चळवळ, रिडल्स प्रकरण भूमी संघर्ष या संदर्भातील 'पँथरची' भूमिका उल्लेखनीय स्वरूपाची होती. या संदर्भात संघर्षाचे एक विधान पुढीलप्रमाणे उद्धृत करता येईल.

The state finds itself free to discredit the Dalit movement by co-opting the most radical leaders like Dadasaheb Gaikwad, under whose leadership the land struggle of 1959 and 1964 had seriously threatened the post independence state for the first time.[16]

उपरोक्त विधानातून दादासाहेब गायकवाड यांचा संघर्ष लक्षात येतो. त्यांनी सन १९६५ पर्यंत दलित चळवळ चालविली. या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी ९ कोटी दलितांच्या शेतजमिनीसारखे अनेक जटिल प्रश्न सोडविले. यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक गट-तट पडले. उदा.-रामदास आठवले, नामदेव ढसाळ, राजा ढाले,

प्रा. जोगेंद्र कवाडे, ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या गटा-तटांतून महाराष्ट्रातील दलित (महार/बौद्ध) राजकारणाचे विभाजन झाले. प्रत्येकाने आपापल्या संघटनेतून आपले अस्तित्व टिकविल्याचे दिसते.

तथापि, ही चळवळ केवळ 'महार' जातीपुरतीच बहुतांश केंद्रित झालेली दिसते. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात आर.पी.आय., दलित पँथरने केलेले कार्य सर्व अस्पृश्य जातींच्या हितसंबंधाचे ठरले नाही. अस्पृश्यांच्या या संघटनामध्ये 'महारांना' मोठा लाभ मिळाल्याने इतर अस्पृश्य जाती अशा संघटनांपासून दूर राहिल्या. या संदर्भात घनश्याम शहा यांच्या *Politics of Dalit, Movement : From Direct Action to Pressure Group'* या शोधनिबंधात अनेक टीकात्मक दृष्टिकोनातून अध्ययन झाले. त्यांच्या मते – *The Dalit movement has gradually failed in collective mobilization* [17]

एकंदरीत या कालखंडात आर.पी.आय. व दलित पँथरने मातंग तत्सम जातींना मोठ्या प्रमाणावर संधी व प्रतिनिधित्व दिलेले दिसत नाही. त्यांच्या सक्रिय भूमिकेमुळे महार/ बौद्धांना लाभ मिळाला. कारण आर.पी.आय. एक सामाजिक गट व पक्ष म्हणून ही कार्य करीत होता. यातुलनेत मातंगांच्या अल्पसंघटना व तोडीचा नेता राजकारणात व समाजकारणात नव्हता. परिणाम स्वरूप मातंग समुदायास राजकीय लाभांश मिळाला नाही. आणि दुसरीकडे या कालखंडात सुद्धा मातंगांचे प्रश्न समग्र दलित चळवळींने चर्चेला घेतले नाहीत. म्हणून १९८० नंतर महाराष्ट्रात विभागनिहाय संघटना स्थापन व गतिशील होतांना दिसतात.

म्हणून आजच्या परिप्रेक्ष्यात आंबेडकरी तत्त्वज्ञानाच्या आधारावर आजची दलित चळवळ कशी आहे या संदर्भाचे उत्तर प्रदेश व महाराष्ट्र या दोन राज्यांचा आंबेडकरोत्तर चळवळीच्या संदर्भातील भाष्य वा वास्तव विवेचन करण्याचा प्रयत्न हरीश वानखेडे (दिल्ली) यांनी एका लेखात केलेला आहे. तो द्वंद्वात्मक स्वरूप स्पष्ट करणारा आहे. या संदर्भात लेखकाचे विधान उद्‌बोधक स्वरूपाचे वाटते.

Post Ambedkar Movement for Dalit emancipation in India have had different currents in up, the assertion of the BSP has initiated a new era of democratisation, while the upsurge of Dalit castes through Buddhist conversion has brought social change in Maharashtra. [18]

तात्पर्य, आंबेडकरोत्तर काळातील वा पूर्वीपासून अस्तित्वात असलेली दलित चळवळ ही एकाच वेळी अनेक अगांनी बहुकेंद्री चळवळ आहे; पण आजवरच्या दलित चळवळीने या सामाजिक-सांस्कृतिक परंपरागत वास्तवाचा पुरेशा गांभीर्याने, वस्तुनिष्ठपणे

शोध घेण्याचा प्रयत्न केलेला नाही. आजच्या परिप्रेक्ष्यात विशाल व्यापक दृष्टी असलेले नेतृत्वही लाभले नाही. म्हणून दलित चळवळीचा आजवरचा एकमेव अजेंडा प्रतिक्रियात्मक राहिला. त्यात विधायक सक्रियता आली नाही. पण काही प्रमाणात दलित संघटनांनी संपन्न केलेली भूमिका दुर्लक्षित करता येत नाही.

५. आंबेडकरी चळवळ व मातंग समुदाय :

महाराष्ट्रात महार, मातंग, चांभार, मेहतर या मुख्यत्वे सर्व गावगाड्यातील अस्पृश्य जाती आहेत. खरे पाहता जातिव्यवस्थेमध्ये भारतीय पातळीवर केवळ दोनच जाती सापडतात; त्या म्हणजे ब्राह्मण व चर्मकार. बाकी जाती या प्रादेशिक पातळीवर वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जातात. म्हणून मातंग समाजाचा विचार हा 'महाराष्ट्र'संदर्भात मर्यादित अर्थाने करावा लागतो. आज महाराष्ट्रात जागृती होत आहे. याचाच एक परिणाम म्हणजे ठिकठिकाणी मातंग परिषदा, मेळावे होताना दिसत आहेत. मातंग समाज हा वस्ताद लहुजी साळवे व साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या विचार व कार्याने प्रेरित होऊन त्यांची जयंती, पुण्यतिथी साजरी करतो. अशा प्रकारे आपल्या अस्मिताप्रति निष्ठा वाहिल्या जातात. पण मूळ प्रश्न या संदर्भात असा उपस्थित होतो की, मातंग समाज व आंबेडकरी चळवळ यांच्यातील आंतरसंबंध कसे आहेत, मातंग समाज आंबेडकरी चळवळींला किती प्रमाणात प्राधान्य देतो आणि आंबेडकरी चळवळ मातंग समाजास न्याय देते का ? आंबेडकरी चळवळीत मातंगांची स्थिती काय ? अशा प्रश्नांतूनच उपरोक्त विषयाच्या शीर्षकाचे विश्लेषण करावे लागेल. डॉ आंबेडकरांच्या काळापासून ते आजतागायत महार-मातंग समाजातील संबंध अविश्वासपूर्व राहिलेले आहेत. या विश्वासामागे एक तात्त्विक भूमिका होती. ती म्हणजे सन १९५६ नंतर धर्मांतर केल्यामुळे राखीव जागा कमी केल्या गेल्या. बौद्ध झालेल्या राजकीय कार्यकर्त्यांनी राखीव जागांसाठी आपली सोडून दिलेली जात वापरली. मातंग समाजाचे म्हणणे असे आहे की, 'आता राखीव जागा उरल्यात या फक्त बौद्धेतरांसाठी आहेत. बौद्धांनी त्यावर हक्क सांगू नये.[११]

ही वस्तुस्थिती फारशी लक्षात न घेता महार पुढारी 'लढायला आम्ही अन् फायद्याला हे' (अविनाश डोळस : १९९५ : ६०) असा प्रतिप्रश्न उपस्थित करतात. पण या लढ्यामुळे मातंग समाजाला किती प्रमाणात लाभ झाला हा एक प्रश्न या संदर्भात उपस्थित करता येईल. दुसरा एक प्रश्न असा की, मातंग साधे 'जय भीम' म्हणून कृतज्ञता व्यक्त करीत नाहीत, ही आंबेडकरी अनुयायांची भूमिका रास्त वाटत नाही. कारण अनेक मातंग समूह गावगाड्यापासून ते शहरापर्यंत 'जय भीम' म्हणतात. शिवाय काही मातंग संघटनांनी 'जय भीम' 'जयभारत' हा वंदनीय नारा स्वीकारला आहे, याकडे आंबेडकरी चळवळीने दुर्लक्ष केले आहे. याचप्रमाणे दादासाहेब क्षीरसागर

(अमरावती - विदर्भ), ॲड. एकनाथ आव्हाड, (बीड-मराठवाडा) यांनी तर बौद्ध धर्म स्वीकारून मातंग समाज परिवर्तनाचा लढा हाती घेतलेला आहे; चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

चर्चेचा तिसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, बहुतांश मातंग समाजाने हिंदू धर्माचा त्याग न करता बौद्ध धर्माकडे पाठ फिरवली. पण ते बौद्ध धर्माचा विरोध करीत नाहीत, तर आदरच करतात. परिवर्तनावादी चळवळी संदर्भात प्रबोधन करताना आढळतात. म्हणून आंबेडकरी चळवळीची भूमिका अशी आहे की, 'मातंग' समाजाने पारंपरिक धर्म सोडला पाहिजे. पण धर्म बदलला तर जात नष्ट होईल का अशा निर्माण होणाऱ्या प्रश्नातून मातंग समाज हिंदुत्ववादी शक्तींच्या अधिक जवळ गेला. त्याचे चित्र सन १९९५ च्या सुमारास राजकीय दृष्टीने आपण पाहिले आहे.

तात्पर्य, मातंग समाज व आंबेडकरी चळवळ यांचा अन्वयार्थ प्रस्थापित करताना राखीव जागांचा लाभ, धर्मांतर या घटना अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या वाटतात. यावरून दलितांतर्गत एकात्मता नष्ट होताना दिसते. तथापि, महार, मांग, चांभार या सर्व दलित समाज घटकांना आंबेडकरी चळवळीमध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न झाला. परंतु त्यास म्हणावे तसे यश प्राप्त झाले नाही. प्रामुख्याने महार समाजच या चळवळीमध्ये सहभागी झाला. आजही या परिस्थितीमध्ये फार मोठा फरक पडलेला नाही.[२०]

आंबेडकरी चळवळीत मातंग समाजाचा सहभाग मोठ्या प्रमाणावर नव्हता पण मातंग समुदायाने बहुतेक वेळा पूर्वाश्रमीच्या महारांबरोबर चळवळीत साथ दिल्याचा इतिहास आहे. व विरोधाचाही दाखला दिसतो. विरोध करणारे अल्प होते. पण बहुसंख्य चळवळीला प्रतिसाद देणारे होते. धर्मांतराची घोषणा करणारा मोठा दुसरा समूह मातंगच होता. परंतु या सकारात्मक विचारांकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. मातंग हे सहज मिळणाऱ्या प्राप्तीचे वाटेकरी आहेत. म्हणून मातंग समुदायाची आंबेडकर चळवळीची स्थिती ही असंदिग्ध, कधी सहकार्याची व कधी असहकार्याची दिसून येते. म्हणून मैत्रीपूर्ण संबंधाकरिता या परिप्रेक्ष्यातूनच याकडे पाहणे सामाजिक हिताचे आहे. तसेच आंबेडकरी चळवळीतील नेतृत्व समूहाने मागे पडलेल्या मातंग समुदायालाही आपल्याबरोबर आणण्याचे कार्य आपले कर्तव्य म्हणून करावे. तेव्हाच कुठे दोन समुदायांतील बिघडलेले आंतरसंबंध न्यायपूर्ण होतील. परिणामतः मातंग समुदायही आंबेडकरी चळवळीला अधिक प्रमाणात प्राधान्य देईल.

५.५ प्रदेशवार मातंग जाती संघटना :

अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या प्रत्येक जात समुदायाचे प्रश्न, समस्या वेगवेगळ्या दिसतात. म्हणूनच प्रत्येक जातीसमूह आपले गट, संघटना स्थापून न्याय्य-हक्कांसाठी

लढा देताना आढळतात. अशांपैकी हिंदू दलितांची, अर्थात मातंग जातीसमूहाची संघटना महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात स्थापन होऊन लढा देताना दिसते. आंबेडकरपूर्वकालीन दलित चळवळीत काही मातंग कार्यकर्ते सहभागी झालेले होते. 'महार' समुदायनिर्मित संघटनांमध्ये कार्यरत असताना त्यांच्या पदरी निराशा आलेली दिसते. पूर्वी महारांप्रमाणे मातंग समुदायातून एकही नेता निपजला नाही. त्यामुळे मातंग समूहाचे अनेक प्रश्न वा समस्या चव्हाट्यावर सार्वजनिक रीतीने मांडल्या गेलेल्या नाहीत अशा प्रकारे एका दुर्बल समाजघटकाचे प्रश्न निर्मूलनासाठी समुदायाची संघटना महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते, हे ओळखून सन १९६० नंतरच्या राजकारणात संघटना निर्मितीवर भर देण्यात आला. आंबेडकरी चळवळीत आपले प्रश्न सुटणार नाहीत, असे मत झाल्याने मातंग समुदायाने स्वतंत्र संघटना स्थापन केली. अशा संघटनांची प्रदेशवार माहिती व त्यांच्या लढ्यासंदर्भातील चर्चा पुढीलप्रमाणे –

१. पश्चिम महाराष्ट्रातील मातंग समुदाय संघटना :

पश्चिम महाराष्ट्र हा महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा भाग आहे. सहकारी चळवळ व राजकारणातील वर्चस्व हे या विभागाचे वैशिष्ट्य आहे. या विभागात वास्तव्य करून राहणाऱ्या मातंग समुदायाचे प्रश्न व त्यासंदर्भात निर्माण झालेल्या संघटना या जास्त प्रमाणावर आढळतात. प. महाराष्ट्रातील 'पुणे' जिल्ह्यात सर्वाधिक मातंग समुदायाची संख्या आढळते, (पाहा-२००१ चा जनगणना अहवाल). या भागात सन १९६० च्या दशकानंतर हळुवारपणे जनसंघटन निर्माण करण्याचा मातंगांचा पहिला प्रयत्न ॲड. तात्यासाहेब भिंगारदिवे यांच्या नेतृत्वाखाली 'मातंग समाजसुधारक समिती' (१९६० नंतरची) स्थापन करून झालेला आहे. या समितीने मातंग समाजात सुधारणा व जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यासाठी पारंपरिक व्यवसाय सोडून नवे व्यवसाय समाजाने अंगीकृत करावे ही एक विचारधारा होती. याकरिता त्यांनी लढाही दिला. तात्यासाहेब भिंगारदिवे हे विधानसभेत जनतेचे प्रतिनिधी (सन १९६२-६७) होते. त्यांचे नेतृत्व तत्कालीन समाजव्यवस्थेला प्रभावीत करणारे होते. यानंतर प. महाराष्ट्रात 'दलित स्वयंसेवक संघ' (१९७७) नावाची संघटना मोहन वाघमारे, मधुकर तुपसुंदर, बापू पाटोळे, विष्णू सकट आदी मातंग कार्यकर्त्यांनी स्थापन केली. ही मातंग समुदायाची राजकीय संघटना असून रचनात्मक, परिवर्तनवादी स्वरूपाचे कार्य करण्याचा तिचा हेतू आहे. या संघटनेने काही विधायक स्वरूपाचे कार्य केलेले आहे. मातंग समुदायात जी अंधश्रद्धा, परंपरा, खुळ्या कल्पना आहेत, त्यातून समाजाला बाहेर काढून जागृत करण्याचे कार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे महात्मा फुले महामंडळाकडून मातंगांना कर्ज मिळवून देण्याचे कार्यही केलेले आहे.

समाज आपल्या मानवी हक्कांसदर्भात सजग व्हावा याकरिता संघाने अनेक बौद्धिकांचे आयोजन केलेले आहे.

प. महाराष्ट्रातील तिसरी महत्त्वाची संघटना म्हणजे 'अखिल भारतीय मातंग' (१९८०) ही संघटना बाबासाहेब गोपले यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे स्थापन करण्यात आली. महाराष्ट्रातील ही एक महत्त्वपूर्ण संघटना मानली जाते. नामदेव ढसाळ, राजा ढाले व अन्य काही जणांनी 'दलित पँथर'सारखी आक्रमक संघटना निर्माण करून प्रश्न निर्मूलनाच्या प्रयत्न केला. त्याप्रमाणेच समस्या निर्मूलनाकरिता गोपलेंनी दलित पँथरची भूमिका अंगीकृत केली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून आलेल्या या तरुणाला शहरातील मातंग समाजाचे अनेक प्रश्न निर्दशनास आले आणि त्यांनी त्या निर्मूलनासाठी मुंबईतील मातंगांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांतूनच त्यांना यश संपादन करता आले. समुदायांच्या प्रश्नांचे सार्वजनिकीकरण करण्याचा प्रयत्न केला. तसे पाहता बाबासाहेब गोपलेंचे नेतृत्व विद्वताप्रचुर नाही. पण मातंग समुदायाची प्रगती वा विकास झाला पाहिजे अशी प्रबळ भावना मात्र त्यात दिसते. समाजाचे कल्याण झाले पाहिजे अशा स्वरूपाची त्यांची कृती व भूमिका राहिली आहे. बाबासाहेब गोपलेंनी २५ वा ऐतिहासिक क्रांतिचक्र परिवर्तन दिन व क्रांतिवीर साळवे द्वि जन्मशताब्दीनिमित्त मुंबई येथे भव्य मातंग समाज मेळावा घेतल्याची नोंद आहे. हा मेळावा समाज जागृतीसाठी होता. या मेळाव्यात भारतीय बहुजन आघाडी, अखिल भारतीय मातंग संघ, भारतीय टायगर सेना, भारतीय बहुजन युवक आघाडी, भा. बहूजन महिला आघाडी, विकास गोपले विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्त उपस्थित होते. (प्रसिद्धी पत्रक : प्रकाशक अ.भा.मा. संघ : १७ जानेवारी २००७ : मुंबई).

तात्पर्य, महासंघाने अनेक विधायक स्वरूपाचे कार्य पार पाडले आहे. २७ एप्रिल १९८२ रोजी ठाण्याच्या कलेक्टर कार्यालयावर मातंग लोकांचा भव्य मोर्चा आपल्या न्याय्यपूर्ण मागण्यांसाठी काढण्यात आला होता. तसेच परभणी येथे १६ नोव्हेंबर १९८५ रोजी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी लाठीहल्ला केल्याने त्यात अनेक जण जखमी झाले होते. याचप्रमाणे जालन्यातही १९ नोव्हेंबर १९८५ रोजी महासंघाने मोर्चा काढल्याची नोंद आहे.

या महासंघाने मातंगांचा संघर्ष वेळोवेळी तीव्र पद्धतीने केला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे २३ एप्रिल १९८४ रोजी १८ मागण्या शासनास सादर केल्या आहेत. त्या मातंगांच्या मागण्यांचे ऐतिहासिक दस्तऐवज समजण्यास हरकत नाही. त्यातील एक महत्त्वाची मागणी म्हणजे, 'शासनाने मातंग विकास महामंडळाची स्थापना करावी' ही होय. नुसती मागणी केली नसून त्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्रभर आंदोलन, मोर्चे, काढण्यात आले. परिणामतः शासनाने त्यापूर्वीच 'मागणी मंजूर' करून 'लोकशाहीर

अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ' स्थापन केले. तात्पर्य, महामंडळाच्या निर्मितीचे श्रेय बाबासाहेब गोपलेंनाच जाते. त्यांच्या कार्यप्रवृत्तीमुळे आजच्या परिप्रेक्ष्यात महासंघाचे कार्य जरी मंद झाले तरी १९८०-२००० या दोन दशकांतील भूमिका उल्लेखनीय स्वरूपाची आहे. सन १९९९ पासून गोपले हे मातंग समुदायास ८टक्के आरक्षण मिळावे अशी मागणी करून शासनाचे लक्ष वेधण्याचे कार्य केले. (गणपत भिसे : २००७ :१३) गोपलेंनी मातंग समाजाचे प्रश्न नीटपणे हाताळल्यामुळेच त्यांचे जनसंघटन ग्रामीण भागातही आढळते. खरे तर त्यांच्या रूपाने महाराष्ट्र स्तरावर महत्त्वाचा सामाजिक नेता मिळाला आहे. त्यांच्या कार्यासंदर्भात गौरव म्हणून गीत रचलेल्या कॅसेट्स बाजारात उपलब्ध आहेत. मातंग समाज अभ्यास आयोगाच्या निर्मितीतही त्यांचा सिंहाचा वाटा आहे. म्हणूनच विलासराव देशमुख म्हणतात की, २२ वर्षे बाबासाहेब गोपलेंनी समाजासाठी संघर्ष केलेला आहे.[२१] तात्पर्य, ही एक महत्त्वाची संघटना मानली जाते. अलीकडे या संघटनेने मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळावे यासाठी १७ जानेवारी २००९ रोजी मंत्रालयावर धडक मोर्चा काढून शक्तिप्रदर्शन केले.

प. महाराष्ट्रातील चौथी महत्त्वपूर्ण संघटना म्हणजे, 'अण्णाभाऊ साठे फाऊंडेशन' होय (१५ ऑगस्ट १९७०, महाराष्ट्र शासन, रजिस्ट्रेशन क्रमांक एम.ए.एच., १०५० पुणे) विश्वस्त नोंदणी क्रमांक एफ ८४५ (पुणे). ही पुण्यातील एक प्रभावी संघटना आहे. या संघटनेची स्थापना बाबूराव विष्णू सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार पेठ, पुणे येथे झाली. या फाऊंडेशनने महाराष्ट्रात विविध कार्यांतून आपली ओळख प्रस्थापित केलेली आहे. सन १९७० ते २००० या कालखंडात फाऊंडेशनने समाजाच्या रचनात्मक प्रबोधनाद्वारे परिवर्तनासाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. **'ज्ञानस्य उत्कर्षः ध्येयम'** ही विचारधारा घेऊन फाऊंडेशन कार्य करते; जे शिक्षणासंबंधी महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मनोबल उंचावण्यासाठी पारितोषिक देणे *(Gold Medal),* याचबरोबर प्रचाराद्वारे व अधिवेशन आयोजित करून महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. पारितोषिक देण्याची पद्धत ही एफ.डब्ल्यू. टेलर यांच्याशी जुळताना दिसते. कारण टेलरने औद्योगिक नफ्यासाठी, मनोबल उंचावण्यासाठी पारितोषिक, बक्षीस ही संकल्पना स्वीकारलेली होती.

फाऊंडेशनने अनेक राजकीय, सामजिक, शैक्षणिक तज्ज्ञांना व्यासपीठावर पाचारण केले आहे. त्यात कै. यशवंतराव चव्हाण यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना पाचारण केले; त्यांचा मार्गदर्शनाचा लाभ घेतला. फाऊंडेशनचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे मातंग समाजात प्रतीकांची निर्मिती व प्रसार करण्यासाठी पुण्यात प्रथमतः अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करून अण्णाभाऊंचा पुतळा प्रथम महानगरपालिकेच्या माध्यमातून उभा केला आहे. तात्पर्य, फाऊंडेशनने आपल्या कार्याचा

विस्तार मराठवाडा, पूर्व खान्देश, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र या भूभागात केला. याचप्रमाणे समुदायावर झालेल्या अत्याचारांच्या नोंदीचे व्यवस्थित संकलन *(Documentation)* केलेले आहे. याचप्रमाणे ही संघटना अलीकडे मातंग समाज अभ्यास आयोगाची अंमलबजावणी व्हावी या करिता संघर्ष करताना व शिबिरे भरवतांना दिसते. म्हणून सध्या ही संघटना शिफारशीची अंमलबजावणी हा प्रश्न घेऊन लढा देत आहे. म्हणून ही संघटना *issue based* स्वरूपाची आहे असे म्हणता येईल. ते विशेष महत्त्वाचे मानावे लागेल.

या भागातील पाचवी संघटना म्हणजे 'दलित महासंघ' ही समुदायातील प्रभावी अशी संघटना आहे. ही संघटना महाराष्ट्राच्या सर्व भागांत विखुरलेली आहे. प्रा. मच्छिंद्र सकटे हे या संघटनेचे संस्थापक आहेत. सामाजिक, धार्मिक हक्क प्राप्तीच्या प्रयत्नांकरिता लढा देणारी ही संघटना आहे. ही संघटना प. महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भासह, खान्देशातही आढळते. खान्देशातील जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यंत संघटनेच्या नामफलकावर अस्तित्वात असलेले आढळते. दलित महासंघाने प्रबोधने, सामाजिक व धार्मिक हक्कांसाठी संघर्ष केले. आजच्या परिप्रेक्ष्यात संघटनेची धार्मिक हक्काची कृती उल्लेखनीय स्वरूपाची आहे. सकटे हे सामाजिक व्यासपीठावरूनही फुले-शाहू-आंबेडकर-साठे या थोर पुरुषाचे विचार आत्मसात करून समाजात रुजविण्याचा प्रयत्न करतात (पाहा- संबोधी व्याख्यानमाला: नंदनवन कॉलनी: औरंगाबाद: २००८). पण या संघटनेने राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंध प्रस्थापित केल्यामुळे सामाजिक प्रश्नांबाबत कठोर भूमिका घेतांना ही संघटना दिसत नाही आणि चळवळींसाठी संघटनेकडे प्रश्न नाहीत. (गणपत भिसे : २००७ : ३५-३६) परंतु ग्रामीण क्षेत्रात मंदिर प्रवेश करण्याचा व समुदायावरील अन्याय,अत्याचार दूर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला आहे.

'बहुजन रयत परिषद' ही या भागातील एक प्रभावी संघटना आहे. प्रा. लक्ष्मणराव ढोबळेंच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली संघटना आहे. या संघटनेने संपूर्ण महाराष्ट्रभर मातंग समुदायाचे संघटन केले. व्यापक उद्देशाने बहुजन रयत परिषदेची स्थापना झालेली नव्हती. मातंग समुदायाच्या चळवळीसाठी स्पीडब्रेक तयार करणे या चळवळीचे एक ध्येय होते. याचप्रमाणे अधून-मधून 'मोहोळला' महाराष्ट्रातील कार्यकर्ते बोलावून चिंतन शिबिरे, व्याख्याने आयोजित केली. (गणपत भिसे : २००७ : १८) बहुजन रयत परिषदेच्या जळगाव शाखेने जिल्हाधिकाऱ्यांना काही मागण्या दिल्या. त्यात दरिद्र्यरेषेखालील याद्यांचे फेर सर्वेक्षण, मंडळाचे भाग भांडवल दुप्पट करणे, विद्यार्थी शिष्यवृत्तीत वाढ करणे, मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेसाठी भेटी व तरतूद करणे अशा विविध मागण्यांसाठी उपोषणासाठी आंदोलनाचा इशारा याचप्रमाणे औरंगाबाद शाखेने घरकुल योजना, गायरान जमिनी, स्मशानभूमी आदी मागण्यांसाठी मंत्रिमंडळ बैठकीवर

मोर्चा नेला. (दै.लोकमत : ८ सप्टेंबर २००८ : २). या संघटनेच्या शाखा महाराष्ट्रभर आढळून येतात. पण त्याचा विशेष प्रभाव प. महाराष्ट्रात जास्त आहे. ढोबळे हे राज्यात मंत्री असताना जनसंघटन *Mobilisation* निर्माण करून समुदायाच्या निर्मूलनाचा प्रयत्न केला. ढोबळे जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री असताना खान्देशात 'बहुजन रयत परिषदेचा' विस्तार केला. हे त्या भागातील नाम फलकावरून लक्षात येते.

सन १९७० नंतरच्या दशकात मातंग समुदायाची एक सशक्त अशी सातवी संघटना म्हणजे 'दलित विकास आघाडी' ही होय. समाजातील प्रस्थापित नेतृत्वाला शह देण्यासाठी आपली एक संघटना असावी या हेतूने जयवंतराव आवळेंच्या समर्थकांनी संघटनेच्या निर्मितीची आग्रही मागणी धरल्याने 'दलित विकास आघाडी'ची स्थापना झाली. जयवंतराव आवळे हे या संघटनेचे अध्यक्ष आहेत. या दलित विकास आघाडीचे स्वरूप सामाजिक नव्हते तर पूर्ण राजकीय होते. (गणपत भिसे : २००७ : २०-२१) परंतु या संघटनेने 'आरक्षणा' संदर्भात शासनाकडे मागणीचा पाठपुरावा केलेला आहे. आयोग नेमावा असा प्रस्ताव विधिमंडळ चर्चेत आला होता. पण त्यावर अन्य मागासवर्गीय मंत्र्यांनी तीव्र आक्षेप घेतला. (पाहा- दै. सकाळ,मुंबई उपनगर,बुधवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २००१). पण जयवंतराव आवळेंच्या वैचारिकतेमुळे त्या भागात त्यांनी मातंग समुदायाचे सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

प. महाराष्ट्रातील आणखीन एक आठवी सक्रिय संघटना म्हणजे 'मातंग एकता आंदोलन' ही संघटना आमदार रमेश बागवेंच्या नेतृत्वातून स्थापन झाली. पुणे शहरातील अनेक प्रबळ संघटनांपैकी ती एक मानली जाते. या संघटनेनेसुद्धा काही रचनात्मक स्वरूपाचे कार्य केलेले आहे. मातंगांचे जे काही प्रश्न आहेत, ते शोधून त्यासंबंधीच्या मागण्या शासनासमोर मांडून त्यांचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न या संघटनेने केलेला आहे. रमेश बागवे हे पर्वती मतदारसंघाचे (पुणे) तरुण आमदार असल्याने जनसंघटन प्रभावी बनले आहे. या भागातील नववी प्रभावी युवकांची संघटना म्हणजे 'क्रांतिवीर लहुजी शक्तिसेना' या संघटनेचासुद्धा नामोल्लेख करावा लागेल. कारण तरुणांची फळी निर्माणाचा प्रयत्न या संघटनेमार्फत होत आहे. ही संघटना श्री. शंकर तडाखे (पुणे) यांच्या नेतृत्वातून साकार झाली. तात्पर्य, मातंगांच्या स्वतंत्र अस्तित्वासाठी ही संघटना आजच्या परिपेक्ष्यात कार्य करताना दिसते.

या भूभागातील दहावी सक्रिय तरुण वर्गाची 'दलित युवक आंदोलन' ही एक सामाजिक संघटना आहे. सचिन बगाडे या युवकाच्या नेतृत्वाखाली फेब्रुवारी २००३ पासून पुणे शहरात मातंग समुदायांच्या प्रश्नांवर आक्रमक लढा देताना दिसते. या संघटनेने दोन महत्त्वाची विधायक कार्ये विशिष्ट तंत्राने *Techinque* पूर्ण केलेली आहेत. पहिले कार्य म्हणजे या संघटनेच्या सक्रियतेमुळे पुणे महानगरपालिकेला

अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे बांधकाम बी.ओ.टी. तत्त्वावर करण्याचे धोरण बदलावे लागले आहे. दुसरे कार्य म्हणजे, ब्रिटिशांविरुद्ध खडकीच्या लढाईत (सन १८१७) शहीद झालेल्या राघोजी साळवेंचे स्मारक जे मांगीरबाबा नावाने प्रसिद्ध होते, ते पुणे महानगरपालिकेने तोडल्यानंतर जे जनआंदोलन आक्रमकपणे पुढे आले, त्यांचे नेतृत्व या संघटनेने केले आहे.

खरे पाहता युवक चळवळीला एक इतिहास आहे. सन १९६० ते १९७० हा जगभरातील युवकांच्या अस्वस्थतेचा काळ होता. या काळात युवक म्हणून ज्या प्रेरणा, प्रवाह, विचार रुजले, त्यांचीच विविध रूपे नंतरच्या काळात युवक चळवळीतील विविध प्रवाहांना विस्तारता आली. डॉ. आंबेडकरांचा वारसा सांगणारा महाराष्ट्रातला आर.पी.आय. पक्ष संधीसाधू बनला हे इथल्या तरुण दलितांना जाणवत होते. या अवस्थेतून महाराष्ट्रातील युवक चळवळ उभी राहिली.[२२] अलीकडे याच आशयातून हिंदू दलितांच्या युवक संघटना निर्माण होताना आणि सकारात्मक भूमिका घेताना दिसतात. तात्पर्य, आजच्या परिप्रेक्ष्यात 'दलित युवक आंदोलनाची' व त्यांच्या नवतंत्राची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते.

पश्चिम महाराष्ट्रालगत बृहन्मुंबई भागातील संघटना म्हणजे 'महाराष्ट्र मातंग सेना' (मुंबई) ही होय. या संघटनेचे प्रदेशाध्यक्ष 'महादेव गालफोडे' आहेत. ही संघटना अलीकडील असून सामाजिक प्रश्नांची जाण असणारी आहे. मातंग सेनेने समाज प्रबोधन, परिवर्तन याकरिता चिंतन शिबिरांचे आयोजन केले. या मातंग सेनेचे चिंतन शिबीर ०५/०१/०८ रोजी मुंबईत (कांदिवली प.) संपन्न झाले. या शिबिरात खालील महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या:-

१) अण्णाभाऊ साठेंना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा.

२) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळास २०० कोटी रुपये अनुदान देण्यात यावेत.

३) अण्णाभाऊंचे भव्य स्मारक उभे करण्यासाठी शासनाने १०० एकर जमीन उपलब्ध करून द्यावी.

उपरोक्त मागण्यातून समाज जनसंघटित करण्याचे प्रयत्न मातंग सेनेने केल्याचे दिसते.

'रि.पा.इं. मातंग आघाडी' (सोलापूर) ही एक महत्त्वाची संघटना मानली जाते. समुदायाचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी मोर्चा, मेळावा, रास्ता रोको यासारख्या मार्गांचा अवलंब संघटनेने केला आहे. या संघटनेला बळ देण्याचे आणि प्रश्नांचा पाठपुरावा करण्याचे कार्य प्रामुख्याने ज्ञानदेव खंडागळे, भाग्यवान शिंदे, महेन्द्र जोगदंड, राम पारखे इत्यादींनी केले आहे. मागासवर्गीय महामंडळांची कर्ज माफ करावीत, यांसह विविध

प्रश्नांसाठी रिपब्लिकन मातंग आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय २४ ऑक्टोबर २००८ रोजी मोर्चा काढण्यात आला. त्यातील काही मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे उद्धृत करता येतील :-

पहिले, मातंग समाज अभ्यास अहवाल आयोग मंजूर करावा. दुसरे, डॉ. आंबेडकर भवनाचे त्वरित भूमिपूजन करावे. तिसरे, मागासवर्गीय महामंडळाचे कर्ज माफ करावे.चौथे, दलित समाजाला ५ एकर जिरायती व २ एकर बागायती जमिनी द्याव्यात.

उपरोक्त मागणीत शेवटच्या क्रमांकाची मागणी ही नावीन्यपूर्ण स्वरूपाची वाटते. या संघटेने हे एक वैशिष्ट्य नोंदविता येईल. 'महाराष्ट्र मातंग समाज संघटना' ही तेरावी संघटना म्हणून नामोल्लेख करता येईल. या संघटेनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही हिंदुत्ववादी विचारसरणीच्या परिघात कार्यरत आहे. मातंगांनी जातीअंत पक्षांच्या बांधणीत भरती व्हावे, जातीसमर्थक की धर्मांधतावादी पक्ष संघटनेत जावे हा प्रश्न संघटनेतून निर्माण होतो. १९९५ सालच्या विधानसभा निवडणुकीत हिंदुत्ववादी पक्षांनी मांगांना तिकिटे देऊन निवडून आणले. त्यातून बौद्धांच्या विद्रोही चळवळीला शह देण्यात हे उजवे पक्ष यशस्वी ठरले आणि हिंदू दलितांच्या नावाने संघटना बांधू लागले. भाजप-सेनेच्या सत्तेत सहभागी झाल्यावर समाजकल्याण राज्यमंत्री दिलीप कांबळे हे 'महाराष्ट्र मातंग समाज संघटनेची' स्थापना करतात आणि मातंग मेळाव्याच्या माध्यमातून समाज जनसंघटित करतात. मूलत: ही संघटना खालील दोन मागण्यांवर भर देते. पहिली, मातंग, समाजाला ५ टक्के स्वतंत्र राखीव जागा मिळाल्या पाहिजेत. दुसरी, 'मातंगा तू जागा हो, संघर्षाच्या धागा हो' या घोषवाक्यातून समाज जागृत व सजग करण्याचा प्रयत्न करताना ही संघटना दिसते.[२३] या संघटनेव्यतिरिक्त 'राष्ट्रीय मातंग शक्ती' ही एक संघटना प. महाराष्ट्रात कार्यरत आहे. रावसाहेब संतापूरकर त्या संघटनेचे नेतृत्व करतात. सामाजिक प्रश्नासंदर्भात ही संघटना कार्य करताना आढळते.

अशा प्रकारे मातंग पुढारी, कार्यकर्ते समुदायाच्या उत्थानासाठी संघटन बांधताना व सक्रियपणे कार्य करताना दिसतात. पण काही मातंग अन्य संघटनांमध्ये (जातीनिरपेक्ष) आढळतात. उदा. मा. विरशीभाई मातंग हे 'बामसेफ' चळवळीत पूर्ण वेळ प्रचारक म्हणून कार्य करताना दिसतात. ते महाराष्ट्रात प्रबोधन वर्गात मार्गदर्शन करतानाही दिसतात.[२४]

२. विदर्भातील मातंग समाज संघटना :

'विदर्भ' हा एक महत्त्वाचा भूभाग आहे. महाराष्ट्राची उपराजधानी 'नागपूर' शहर विदर्भातच आहे. विदर्भ हा राजकीय दृष्टीने प्रबळ झालेला दिसतो. म्हणून विदर्भ राज्याची स्वतंत्र मागणी जोर धरू पाहत आहे. शिवाय सांस्कृतिक-ऐतिहासिकदृष्ट्या विदर्भाचे महत्त्व असे की, डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माची दीक्षा विदर्भात (नागपूर) १४ ऑक्टोबर

१९५६ रोजी घेतली. म्हणून महार समुदायाचे राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक वर्चस्व येथे असणे स्वाभाविक आहे. यामुळे तेथे 'महार' समुदायाच्या संघटना प्रबळ झालेल्या दिसतात. या अनुषंगाने विचार केल्यास मातंग समुदाय संख्येने कमी असल्याने शिवाय सांस्कृतिक-राजकीय सजगतेच्या अभावी प्रबळ दिसत नाही. मात्र थोडी फार जागृती आढळते. सामाजिक चळवळ असावी असा दृष्टिकोन तेथे विकसित होत आहे. या संदर्भात टी.के. ओमेनचे असे म्हणणे आहे की, समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून सामाजिक चळवळ ही सामाजिक बदल घडवून आणणारी विचारप्रणाली आहे.[२५] म्हणून अशा बदलासंदर्भात समाजात प्रगल्भता येताना दिसते.

विदर्भातील मातंग समाजाची पहिली संघटना म्हणजे 'अण्णाभाऊ साठे संघर्ष समिती' (१९७० नंतर) होय. महाराष्ट्रातील अण्णाभाऊ साठे हे एक महत्त्वाचे साहित्यकार म्हणून ओळखले जातात. म. फुलेंना महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्यूथर किंग' म्हणून संबोधले जाते, त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठेंना महाराष्ट्राचे 'मॅक्झिम गार्की' म्हणून संबोधले जाते. ते मातंग समुदायाचे प्रेरणास्थान ठरले आहेत. म्हणून त्यांच्या नावाने विदर्भातील मातंग तरुणांनी 'अण्णाभाऊ साठे संघर्ष समिती' स्थापन केली. या संघटनेच्या स्थापनेत चंद्रकांत वानखेडे, अजब डोंगरे, नाना कांबळे इत्यादींचा सहभाग विशेष स्वरूपाचा आहे.

'दलित विकास आघाडी' व महाराष्ट्र युवक परिषदेने आरक्षणासंदर्भात जी वैचारिक भूमिका घेतली, त्याप्रमाणे संघर्ष समितीनेदेखील मातंगांना स्वतंत्र आरक्षण मिळावे अशी एकमुखी मागणी केल्याचे दिसते. एकंदरीतपणे संघर्ष समितीने ज्या मागण्यांचा शासनाकडे पाठपुरावा केला, त्या अशा की -

पहिले,मातंग समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी 'मातंग विकास महामंडळ' स्थापन करण्यात यावे. दुसरे, मातंग समुदायातील बरोजगारांना पाच लाखांचे कर्ज स्वयंरोजगारासाठी उपलब्ध करून द्यावे. तिसरे,मातंग समुदायातील पात्र व्यक्तींना विविध संस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळावे. चौथे, मातंग स्त्रियांपैकी ज्या दहावी परीक्षा उत्तीर्ण आहेत, त्यांना विनाअट नोकऱ्यांत संधी द्यावी.पाचवे, मातंग समुदायांना गायरान जमिनी वाटप कराव्यात.

उपरोक्त मागण्यांचा पाठपुरावा संघर्ष समितीने केल्याचे दिसते. पण या समितीत कार्य करणारे कार्यकर्ते फार काळ सामाजिक सेवा देऊ शकले नाहीत. ते निव्वळ सामाजिक न राहता राजकारणाकडे आकर्षित झाले. ते बहुतांशपणे काँग्रेस पक्षाशी संलग्न झालेले दिसतात. काँग्रेस पक्षानेही त्यांना सन १९७० नंतर निवडणुकांत पक्षाची उमेदवारी पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात दिलेली दिसते.

विदर्भातील दुसरी व विशेष प्रभावी अशी संघटना म्हणजे 'महाराष्ट्र मातंग समाज समिती' ही होय. या समितीची स्थापना चंद्रकात वानखेडे यांनी केली आहे. चंद्रकांत

वानखेडे हे मातंग समाजाचे एक महत्त्वपूर्ण सामाजिक पुढारी असून ते सन १९५८ पासूनच सामाजिक प्रबोधनाचे कार्य करतात. ते तत्परतेची भूमिका घेताना दिसतात. आजही या संघटनेतील कार्यकर्ते सामाजिक प्रबोधनाचे कार्य करताना दिसतात. या संघटनेचा मूळ हेतू सामाजिक परिवर्तन व समुदायाचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे हा आहे. या दोन उद्देशप्राप्तीसाठी संघटना लढताना दिसते.

'महाराष्ट्र समाज विकास महामंडळ' ही या भागातील तिसरी महत्त्वाची संघटना आहे. या संघटनेची स्थापना व नेतृत्व 'मधुकर कांबळे' यांनी केले आहे. उपरोक्त दोन संघटनेप्रमाणेच सामाजिक प्रश्न हाताळण्याचे कार्य या संघटनेने केल्याचे दिसते. विदर्भातील ग्रामीण भागातही ही संघटना प्रबोधनाचे कार्य करताना दिसते.

विदर्भातील मातंग समुदायातील तरुणांची अलीकडील चौथी संघटना म्हणजे 'दयावान संघटना' (बुलडाणा) ही होय. ती तरुणांची एक नवसामाजिक संघटन म्हणून ओळखली जाते. या संघटनेचे नामफलकही बुलडाणा शहरात दिसतात. निव्वळ सामाजिक प्रबोधन असे या संघटनेचे स्वरूप आहे. या संघटनेचे महत्त्वपूर्ण कार्यकर्ते दादाराव ससाणे, दिलीप चाफेकर, मंगल भालेराव, सचिन दळवी, कृष्णा जाधव, पवन पवार, राजू जाधव व सचिन शिंदे आदी आहेत. या संघटनेचे महत्त्वपूर्ण कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल -

पहिले, मातंग समुदायात समाज प्रबोधन करणे. दुसरे, समुदायात सर्व प्रकारची जागृती घडवून आणणे. तिसरे, सामाजिक कार्यक्रमातून समुदायातील होतकरुंना, विद्यार्थ्यांना मदत करणे अशा स्वरूपाचे कार्य ही संघटना करताना दिसते. अर्थात, संघटनेच्या शीर्षकाप्रमाणे हे कार्य आढळते.[२६]

तात्पर्य, विदर्भातील ज्या सक्रिय चार-पाच संघटना कार्य करताना दिसतात, त्या सर्व संघटनांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक क्षेत्रासंदर्भात जागृती करण्याचे कार्य केले आहे. पण या कार्याची सीमा ही त्या त्या जिल्ह्यापुरती मर्यादित दिसते. म्हणून तिचा विस्तार सर्वत्र आढळत नाही असे या संदर्भातील निरीक्षण आहे.

३. मराठवाड्यातील मातंग समाज संघटना :

'मराठवाडा' हा विभाग महाराष्ट्रातील राजकारण व सामाजिक चळवळींच्या संदर्भात अतिमहत्त्वाचा आहे. राजकीय दृष्टीने या भागाने महाराष्ट्रास शंकरराव चव्हाण, (नांदेड, भोकर मतदारसंघ), विलासराव देशमुख (लातूर), अशोकराव चव्हाण (नांदेड, मुदखेड मतदारसंघ) असे तीन मुख्यमंत्री दिले. म्हणून राजकीय वर्चस्व या भागाचे दिसते. निझाम राजवटीने या भागावर आपले नियंत्रण ठेवले होते. या राजवटीविरुद्ध लढताना अनेक शहीद झाले. शेवटी आपण निझामापासून मुक्त झालो; आणि १७

सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्तिदिन म्हणून पाळला जातो. मराठवाड्यात जातीय दंगली मोठ्या प्रमाणावर झाल्या. विशेष म्हणजे मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीत दलित विरुद्ध सवर्ण यांमध्ये मोठ्या प्रमाणावर द्वंद्व होऊन दलितांची घरे जाळण्यात आली. या चळवळीत 'पोचीराम कांबळे' नावाच्या मातंग व्यक्तीस (टेंभुर्णी, ता. नायगाव, जि. नांदेड) जिवंत जाळण्यात आले. तात्पर्य, अशा घटनेतून मराठवाड्यात दलितांची चळवळ सक्रिय होऊन आक्रमक झाली. याचाच एक भाग म्हणजे महाराष्ट्रात मातंग समाज चळवळीतील आक्रमकता, कार्यकर्ते, संघटना मराठवाड्यात जास्त दिसतात. महार समुदाय, मातंग समुदायाच्या चळवळीचे महत्त्वाचे केंद्र म्हणजे 'मराठवाडा' होय असे संबोधता येईल.

या भागातील मातंग समाजाची पहिली प्रबळ संघटना म्हणजे 'महाराष्ट्र युवक परिषद' (१९६५) ही होय. या भागातील मातंग समुदाय सामाजिक आर्थिक उपेक्षेमुळे असमाधानी होते. म्हणून त्यांनी युवक परिषदेची स्थापना केली. याचप्रमाणे सामाजिक व आर्थिक हितसंवर्धन करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता. या संघटनेचे एक वैशिष्ट्य म्हणजे ही तरुणांची संघटना होती. साधारणपणे या परिषदेने दोन महत्त्वाच्या भूमिका पार पाडल्या आहेत. पहिली, मातंग समुदायातील लोकांनी वाजंत्री वाजवू नये. ग्रामीण भागात सवर्ण जातींकडून मातंग समुदायाची मानहानी केली जात असे. शुभ व अशुभ कार्यात मातंगांतील वाजंत्रींना पाचारण केले जात असे. ती एक कला मातंग समुदायाने जोपासली होती. पण सवर्ण मंडळी त्यांच्या सेवेचा मोबदला न देता त्यांना हाकलून देत असत. ही स्थिती सुधारण्यासाठी युवक परिषदेने वाजंत्री साहित्य जाळण्याचा कृती कार्यक्रम हाती घेतला. यातून संघटनात्मक आशय स्पष्ट होतो. पण आजच्या परिप्रेक्ष्यातही ग्रामीण भागात काही ठिकाणी अंत्यसंस्कारांच्या वेळी वाजंत्री आपली सेवा बजावताना दिसतात. मात्र अशी स्थिती अपवादात्मक दृष्टीने निदर्शनास येते. म्हणून युवक परिषदेने घेतलेली भूमिका किती महत्त्वाची होती याची कल्पना यावरून येते.

दुसरी महत्त्वाची भूमिका म्हणजे मातंग समुदायाने पारंपरिक प्रथा सोडाव्यात, या प्रथा म्हणजे पोतराज सोडणे, सण मागणे या संदर्भात सामाजिक प्रबोधन करण्याचे कार्य युवक परिषदेने केलेले आहे. ही संघटना निव्वळ सामाजिक स्वरूपाची होती, राजकारणापासून ती अलग होती. मात्र आरक्षणाचा लाभ मातंग जातीला मिळाला पाहिजे, असा मुद्दा परिषदेने उपस्थित केल्याचे दिसते. तात्पर्य, अशा स्वरूपाचे कार्य काही कार्यकर्त्यांनी केले. यात मुख्यत्वे करून पुढील व्यक्तींचा समावेश होता. लक्ष्मण राणवळकर, नामदेव राजवळकर, गंगाधर घंटेवाड, गणपत मेकॉने हे सहभागी झाले होते. याचप्रमाणे या भागात सामाजिक प्रथा निर्मूलनासाठी विशेषत: नांदेड जिल्ह्यात दलितमित्र कै. धनाजी पांडुरंग घोडजकर, तुकाराम मंगल सांगवीकर, श्री. लोंढे, लालचंद येताळकर

आदींनी पुढाकार घेतल्याच्या नोंदी आहेत. या युवक परिषदेने पुढील मागण्या महाराष्ट्र शासनाकडे केल्या :-

पहिले, मातंग विकास महामंडळाची स्थापना करण्यात यावी. दुसरे, मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी. तिसरे, राखीव जागा भरताना मातंगांना पुरेशी संधी द्यावी. चौथे, राज्य मंत्रिमंडळात मातंगांना योग्य प्रतिनिधित्व देण्यात यावे. पाचवे, मातंग समाजातील सुशिक्षित बेकारांचे प्रश्न सोडवावेत. सहावे, मातंगांना विविध शासकीय समित्या व मंडळे, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यात प्रतिनिधित्व द्यावे.[२७]

तात्पर्य, युवक परिषदेने मराठवाड्यात भरीव स्वरूपाचे कार्य केल्याचे वरील माहितीवरून निदर्शनास येते. परिषदेची भूमिका समाजहिताला प्राधान्य देणारी आहे.

'क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ' नोंदणीकृत दुसरी संघटना (रजिस्ट्रेशन क्रमांक, १८८१/९०) 'लसाकम' या नावाने महाराष्ट्रात ओळखली जाते. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वस्ताद लहुजी साळवे, अण्णाभाऊ साठे यांच्या विचार व कार्याने प्रभावित होऊन शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थेत नोकरी करणाऱ्या जनसमुदायाच्या उत्थानात महत्त्वाचे योगदान द्यावे या उद्देशाने या संघटनेची स्थापना झाली. ही संघटना महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेली आढळते. सामूहिक विचारविनिमयातून या संघटनेचे कार्य चालते. या संघटनेचे पहिले अध्यक्ष प्रा. खंडागळे हे होते. निलंग्याचे डॉ. भगवान वाघमारे हे विद्यमान अध्यक्ष आहेत. तर औरंगाबादचे रमाकांत गायकवाड महासचिव असून एच.पी गायकवाड औरंगाबाद शाखेचे जिल्हा अध्यक्ष आहेत. प्रा. संजय सांभाळकर संघटक, जिल्हा सचिव आहेत. या संघटनेने केलेल्या कार्यामुळे संघटनेस नावलौकिक प्राप्त झालेला आहे. कर्मचाऱ्यांचे प्रश्न हाताळण्याची भूमिका संघटना पार पाडते. भरती, बदली याबाबत मातंग समाजाच्या उत्थानासाठी अनेक मागण्या संघटनेने शासन दरबारी केल्या आहेत. मातंग समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांचा सत्कार, शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित केल्याचे दिसते.[२८]

याचप्रमाणे निव्वळ सत्कार महत्त्वाचा नसून मातंग विद्यार्थ्यासमोर काळाची आव्हाने काय आहेत? या संदर्भात निरनिराळ्या सभांत मागदर्शन करण्यावर भर देण्यात आला.[२९] तसेच अण्णाभाऊ साठेंच्या विचारांतील उपयुक्तता शोधून त्या संदर्भात चर्चेसाठी परिसंवाद आयोजित केले गेले. या परिसंवादांचा विषय 'यह आझादी झूठी है । देश की जनता भूखी है ।' हा होता. अशा परिसंवादातूनही समाज प्रबोधनाचे कार्य केले, (निमंत्रण पत्रिका : सप्टेंबर २००७ : औरंगाबाद). या संघटनेचे रचनात्मक स्वरूपाचे कार्य म्हणजे, मातंग समुदायातील महिलांना एकत्र करून त्यांचे जनसंघटन करणे हे आहे. त्या दृष्टीने संघटनेने महिला मेळाव्यांचे आयोजन केलेले दिसते. यात मार्गदर्शन

करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. मंगल खिवंसरा यांना पाचारण केले होते.[३०] या संघटनेने सामाजिक प्रबोधनाप्रमाणेच धार्मिक प्रबोधनाकरिता मातंग समुदायातील लोकांना 'गळ टोचून घेणे आरोग्यास हानिकारक आहे' असे जाहीर विनम्र आवाहनसुद्धा केल्याची नोंद आहे. अशा कृतीत महिला भाविकच जास्त असतात. आधुनिक युगात नवसास महत्त्व नसून त्यातून आपली हानी होते अशा स्वरूपाचे प्रबोधन केले आहे (पॉम्प्लेट : एप्रिल २००८ : औरंगाबाद). १४ एप्रिल २००९ रोजी शेंद्रा येथे संपन्न झालेल्या मांगीरबाबा यात्रेत अशाच स्वरूपाचे आवाहन करण्यात आले आहे. या संघटनेने मातंग समुदायासंदर्भातील मागण्यांचा पाठपुरावा शासनाकडे केलेला आहे. तो आजच्या परिप्रेक्ष्यात महत्त्वाचे वाटतो. त्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत :-

पहिले, मातंग समाजाला राज्य मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व मिळावे. दुसरे, सामाजिक न्यायातंर्गत विभागातील विविध मंडळे, महामंडळे तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, खादी बोर्ड, म्हाडा, माध्यमिक, उच्च माध्यमिक मंडळ, लोकसेवा आयोग आदींवर मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांना प्रतिनिधित्व मिळावे. तिसरे, मातंग समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी भटक्या, विमुक्त समाजाच्या धर्तीवर स्वतंत्र आश्रमशाळा सुरू कराव्यात. चौथे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे भाग भांडवल रुपये ५०० कोटींपर्यंत वाढवून एन.एस.एफ.डी.सी. महामंडळाला महाराष्ट्र शासनाने कर्जाची हमी द्यावी.पाचवे, शासकीय व मान्यताप्राप्त खाजगी वसतिगृहांमध्ये मातंग समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी १५ टक्के आरक्षण द्यावे. सहावे, खाजगी उद्योग क्षेत्रात अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षणाची तरतूद करावी.

अशा स्वरूपाच्या मागण्या मुख्यमंत्र्यांना एका निवेदनामार्फत करण्यात आल्या. (पाहा-२५/१०/२००७ रोजी शासनास दिलेले पत्र).

उपरोक्त कार्याशिवाय एक महत्त्वपूर्ण विधायक कार्य म्हणजे 'मातंग समाज राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा' हे होय. हा मेळावा जळगाव येथे घेण्यात आला. महाराष्ट्रातील मातंग समुदायाने आपापसांतील पोटभेद विसरून, भूभाग विसरून विवाह करावेत; समाजाची आर्थिक स्थिती पाहता आजचा विवाहखर्च परवडणारा नाही, म्हणून अशा कार्यक्रमांची आवश्यकता लक्षात घेऊन सामूहिक विवाहाची संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याकरिता वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला. त्यास योग्य प्रतिसादही मिळाला.[३१]

संघटनेने लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग अहवालात नेमके काय आहे? समाजाच्या हिताच्या तरतुदी काय आहेत? या संदर्भात माहिती जाणून घेण्याकरिता चर्चासत्राचे आयोजन करून समाज प्रबोधनाचे कार्य हाती घेतले आहे. दिनांक २५/१२/२००८ रोजी उस्मानाबाद येथे संपन्न झालेल्या चर्चासत्रात डॉ.बी.एस.वाघमारे (औरंगाबाद) यांनी सभेला संबोधित केले आणि समाजाला योग्य

दिशा दिली (पाहा- प्रत्यक्ष उपस्थितीतून प्राप्त केलेली माहिती, ल.सा.क.म. पॉम्प्लेट उस्मानाबाद शाखा). तात्पर्य, अशा प्रकारे 'ल.सा.क.म.चे' कार्यक्रम समाज प्रबोधना संदर्भात महत्त्वाचे ठरले. महाराष्ट्रात मातंग पदाधिकाऱ्यांची ही एकमेव संघटना असून तिचे कार्य रचनात्मक स्वरूपाचे आढळते.

मराठवाड्यात तिसरी आक्रमक संघटना म्हणजे 'लहुजी सेना' ही होय. लहुजी सेनेने संघटनेचा लाल झेंडा सबंध महराष्ट्रात मिरविला. या संघटनेत जिगरबाज कार्यकर्ते होत. लहुजी सेना हे नाव समाजाला भिडणारे व सरळ-सरळ 'मांगवाद' स्वीकारणारे होते. (गणपत भिसे : २००७ : ३७-३८) ही संघटना सन १९९५ च्या सुमारास प्रत्येक जिल्ह्यात दिसू लागली. ही संघटना विशेषत: दशकापासून महाराष्ट्रात, मुख्यत: मुंबई व मराठवाडा विभागात कार्यरत होती. मराठवाड्यात या संघटनेने भरीव स्वरूपाचे कार्य केलेले आहे. या संघटनेचे संस्थापक व्ही. जी. रेड्डी (ता. मुखेड, जि. नांदेड) हे मुंबईत राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरीस असून मातंगांचे जनसंघटन व कार्यकर्ते तयार करून स्वत:चे अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न करतात. मराठवाड्यात मातंग समुदायांच्या प्रश्नासंदर्भात मोर्चे, रास्ता रोको, उपोषण या मार्गांचा अवलंब संघटना करताना दिसते. प्रारंभी या संघटनेत जी. एस. कांबळे, रामचंद्र भरांडे हे मराठवाड्यात सक्रिय होते. त्यांनी अनेक चळवळींचे नेतृत्वही केलेले आहे. पण ते आता यापासून अलिप्त असून स्वतंत्र आंदोलन उभारताना, कार्य करताना दिसतात.

या संघटनेने व मातंग समाजाने धर्माबादमध्ये (जिल्हा. नांदेड) मध्ये १९९९ मध्ये भव्य मातंग समाजाचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात आंध्र प्रदेशचे मातंग समाजाचे पुढारी कृष्णा मादिगा, महाराष्ट्रातील लक्ष्मणराव ढोबळे (तत्कालीन मंत्री), व्ही. जी. रेड्डी यांनी मार्गदर्शन केल्याची नोंद आहे. याचप्रमाणे या संघटनेचे चंद्रकांत रेड्डी बिलोली मतदारसंघातून विधानसभेसाठी उमेदवार म्हणून उभे होते. त्यांनी त्यावेळी जवळपास ८,००० मते प्राप्त केल्याची नोंद आहे. तात्पर्य, लहुजी सेना ही संघटना जेवढ्या आक्रमकपणे पुढे आली, तेवढ्याच त्यांच्या नेतृत्त्व व कार्यप्रणालीमुळे, राजकीयीकरणामुळे मागे पडली आहे. तथापि, लहुजी सेनेचे कार्य स्मरणात राहणारे आहे.

लहुजी सेनेप्रमाणेच 'राष्ट्रीय लहुजी सेना' ही चौथी संघटना मराठवाड्यात कार्यरत असताना आढळते. या संघटनेत मुख्यतः लक्ष्मीकांत शिंदे, देवराम सरोदे, गोरक्षनाथ शेलार, डॉ. के. आर. लोणकर, भाऊसाहेब सांळुके यांच्यासह अन्य कार्यकर्ते सहभागी आहेत. या संघटनेने ९ सप्टेंबर २००८ रोजी मुंबईत मंत्रालयावर दंडा मोर्चा काढला आहे. या संघटनेच्या काही मागण्या खालीलप्रमाणे आहेत :-

पहिले, मागासवर्गीयांनी विविध योजनेंतर्गत घेतलेले कर्ज माफ करावे.दूसरे,लहुजी साळवे अभ्यास आयोगाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

अशा मागण्यांचा पाठपुरावा या संघटनेने शासनाकडे केल्याचे निदर्शनास येते.[३२]

याचप्रमाणे भारतीय लहुजी सेनेने गंगापूर तालुक्यातील झांजर्डी येथे विवाहित मातंग महिलेवर जो बलात्कार करण्यात आला, त्या प्रकरणी अत्याचार करणाऱ्याला कडक शिक्षा करावी अशी मागणी गोरक्षनाथ बोरगे, सुरेश आढावे, अलकाताई मावस इत्यादीनी केली असून या संदर्भात आंदोलनही केले आहे.[३३] मातंग समाजाला स्वतंत्र ८ टक्के आरक्षण द्यावे याकरिता क्रांतिगुरू लहुजी साळवे विकास परिषदेच्या वतीने औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. (पाहा-दै. लोकमत, २२/१२/२००८, औरंगाबाद पुरवणी).

या भागातील आणखीन एक महत्त्वाची 'मानवी हक्क अभियान' नावाची संघटना ॲड. एकनाथराव आव्हाड (माजलगाव, जि. बीड) यांनी स्थापना केली आहे. महाराष्ट्र व राज्याबाहेर 'मानवी हक्क' *Human Rights* कशा स्वरूपाचे आहेत, त्यांची वास्तविक स्थिती काय आहे? या संदर्भात मार्गदर्शन करतात. खरे पाहता ही संघटना केवळ मातंग समाजाची नाही. पण मानवी हक्काचा प्रश्न सर्वसमावेशक आहे. ज्यांच्यावर अन्याय, अत्याचार झाले; मग तो कुठल्याही जातीचा, धर्मांचा असो त्यांनी हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न या संघटनेकडून केला जातो. या संघटनेने दलित अत्याचारांची प्रकरणे लावून धरली आणि विशेष म्हणजे भिल्ल,पारधी, कैकाडी, वडार, बंजारा आदी अल्पसंख्यांकांची मातंग- बौद्धांशी सांगड घातली. या संघटनेच्या कार्यपद्धतीमुळे 'ब्रॉड बेस्ड मूव्हमेंट' म्हणून मानवी हक्क अभियानाकडे पाहिले जाऊ लागले. (गणपत भिसे :२००७ : २२) खरे तर 'मातंग' जातीवर जे अन्याय होत आहेत, ते पाहून त्यांनी मानवी हक्क प्राप्त झाले पाहिजेत. हक्क आहेत पण सवर्ण त्यांना त्यांचा लाभ घेऊ देत नाहीत. म्हणून या दृष्टीने अभियानाची भूमिका महत्त्वाची वाटते.

मानवी हक्क अभियानाने ठिकठिकाणी धरणे आंदोलन पुकारले. त्यातील मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे आहेत : - १) रोजगार हमी योजनेचे ओळखपत्र ताबडतोब द्यावे. २) दारिद्र्यरेषेची यादी तात्काळ जाहीर करावी. ३) अतिक्रमित गायरान जमिनी कास्तकऱ्यांच्या (*Cultivaters*) नावे करण्यात याव्यात. ४) विविध योजनांचे मानधन लाभार्थ्यींना तात्काळ वाटप करावे. ५) सरकारी दवाखाण्यात सर्व सुविधा मिळाव्यात (पॉम्प्लेट : धरणे आंदोलन : २४/०७/२००६ : धारूर, जि. बीड).

मराठवाड्यातील सहावी महात्त्वाची संघटना म्हणजे 'अखिल भारतीय मातंग संघ' ही होय. मातंग समाजाच्या विविध मागण्यांसाठी नादेंड जिल्हा कचेरीसमोर धरणे आंदोलने करण्यात आले. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष भरत खडसे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी संभाजी शिंदे, चंद्रकांत कंधारे, विश्वंभर बसवंते, पांडुरंग दाढेल, संतोष पवार, गणेश कामठेकर, प्रकाश वाघमारे, सुभाष वाघमारे,

अशोक बसवंते, नामदेव वाघमारे, केरबाजी देव कांबळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. या संघटनेच्या प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत :-

१) शासनाने अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे कर्ज माफ करावे.

२) मागासवर्गीयांचा नोकरीतील अनुशेष भरून काढावा.

३) अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करावे.

४) हिंगोली येथील उड्डाण पुलास अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे.

अशा मागण्यांतून शासनाचे लक्ष वेधण्याचे कार्य या संघटनेने केले आहे.[३४]

बीसेफ महाराष्ट्रात मातंग समाज कर्मचाऱ्यांची ही दुसरी संघटना आहे. के.एम.वाघमारे या संघटनेत क्रियाशील आहेत. या संघटनेचे औरंगाबाद जिल्हा महासचिव प्रा. संजय मांजरमकर हे आहेत. 'बीसेफ' या कर्मचाऱ्यांच्या सामाजिक संघटनेच्या वतीने व आर. पी. एफ. या मातंग समाजातील युवक संघटनेच्या वतीने सन २००७ पासून विभागीय स्तरावर मातंग समाज सामाजिक, राजकीय चिंतन शिबिराचे आयोजन औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर व ऑगस्ट २४ मध्ये मुंबई येथे प्रज्ञावंत व मातंग सामाजातील सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, विचारवंतांच्या साक्षीने मोठ्या गांभीर्याने विचारमंथन झाले. ही कर्मचाऱ्यांची एक प्रबळ संघटना असून कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासह मातंग समाजाची राजकीय भूमिका काय असावी? या संदर्भात चिंतन शिबिराचे आयोजन करून समाज प्रबोधनाचे कार्यसुद्धा संघटनेच्या माध्यमातून होत आहे.

तात्पर्य, ही कर्मचारी संघटना असली तरी राजकीय स्वरूपातून कार्य करणारी एक प्रबळ व स्वाभिमानाने जगण्यासाठी राजकीय सौदेबाजीला तयार असणारी संघटना आहे असे विश्लेषण करता येईल (लहुशक्ती : ऑक्टोबर २००८ : २९-३०). याचप्रमाणे ही संघटना बामसेफ / बसपा या सामाजिक संघटना व पक्षांना प्रतिसाद व पाठिंबा देतात.

मराठवाड्यातील महत्त्वाची नववी मातंग समुदायातील तरुण वर्गाची आक्रमक नव संघटना म्हणजे 'फकिरा ब्रिगेड' (रजिस्टर्ड क्रं.२९३/०८) होय. ही संघटना सन २००७ नंतर निर्माण झाली. मातंग समाजाला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात येऊ दिले नाही. म्हणून ही विषमता दूर करण्यासाठी संघटना लढा देत आहे. या संघटनेचे संस्थात्मक अध्यक्ष डॉ. संजय शिंदे आहेत. प्रा. संजय गायकवाड प्रदेशाध्यक्ष असून शाहूराज साठे हे राज्याचे प्रवक्ते आहेत. ही संघटना तरुण वर्गाची नव संघटना असल्याने तिच्या कार्याचा विस्तार भविष्यात होणे स्वाभाविक आहे. पण अल्पावधीत या संघटनेने गावोगावी नामफलक लावले असून काही मागण्यांचा पाठपुरावा शासन दरबारी केला

आहे. १७ सप्टेंबर २००८ रोजी मंत्रिमंडळ बैठकीवर धडक मोर्चा नेला आणि काही मागण्या लावून धरल्या. त्या पुढीलप्रमाणे आहेत :-

पहिले, क्रांतिवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या शिफारशी तात्काळ लागू करा. दुसरे, महाराष्ट्रातील सर्व मागासवर्गीय महामंडळांचे सन २००८ पर्यंतचे कर्ज माफ करा. तिसरे, गायरान जमिनी कसणाऱ्यांच्या नावे करा. चौथे, खाजगी क्षेत्रात मागासवर्गीयांना आरक्षण द्या. पाचवे, दलित कार्यकर्त्यांवर जाणीवपूर्वक नोंदविलेले खंडणी व दरोड्यांचे गुन्हे मागे घ्या. सहावे, दलितांना आत्मसंरक्षणासाठी हत्यारे बाळगण्याची परवानगी द्या. सातवे, व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क भरण्यासंदर्भातले परिपत्रक दरवर्षी न काढता कायमचे काढा. आठवे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत महागाई निर्देशांकानुसार वाढ करा.

उपरोक्त मागण्या शासन दरबारी करणारी आणि त्याच्या अंमलबजावणीचे प्रयत्न करणारी ही अलीकडील एक महत्वपूर्ण संघटना वाटते. तात्पर्य, उपरोक्त काही मागण्या नावीन्यपूर्ण वाटतात.[३५] अलीकडच्या काळात आणखीन एका संघटनेची नोंद घेण्यासारखे आहे. ती म्हणजे 'लोकस्वराज्य आंदोलन' ही संघटना सन २००४ पासून महाराष्ट्रात काम करीत आहे. रामचंद्र भरांडे (अळणी, ता. बिलोली, जि. नांदेड) हे या संघटनेचे संस्थात्मक अध्यक्ष आहेत. मागील चर्चेत आपण 'लहुजी सेनेचा' आढावा घेतला होता. लहुजी सेनेतही रामचंद्र भरांडेंचे योगदान होते. शोषित समाजावरील अन्याय थांबला पाहिजे, महापुरुषांना अभिप्रेत असलेली समाजव्यवस्था निर्माण झाली पाहिजे, असा संघटनेचा हेतू आहे. या संघटनेने आदिवासी, ओ.बी.सी., भटक्या विमुक्त, अल्पसंख्यांकासह विद्यार्थ्यांचे प्रश्न, सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न लावून धरत वंचित माणसांना न्याय्य हक्कांसाठी लक्षवेधी आंदोलन केले आहे.

आंदोलनाचा एक भाग म्हणून संघटनेने १७ सप्टेंबर २००८ रोजी औरंगाबाद येथील मंत्रिमंडळ बैठकीवर मोर्चा काढला. या मोर्चात गणपत रेड्डी, रावसाहेब पवार, नागोराव कमलाकर (जारीकोट : नांदेड), व्ही.जी.डोईवाड (धर्माबाद), संजय कबनूरकर, संतोष कन्नडकर, पी.डी.गोणारकर आदी सहभागी झाले होते. यातील नागोराव कमलाकर, व्ही.जी. डोईवाड तसेच स्वतंत्रपणे बाळासाहेब येताळकर हे सुद्धा सातत्याने समाजाचे प्रश्न हाताळण्याचे कार्य करतात. या संघटनेने मंत्रिमंडळ बैठकीवर काढलेल्या मोर्चातील मागण्या खालीलप्रमाणे आहेत :-

पहिले,मातंग समाजाला लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या अहवालानुसार ५ टक्के आरक्षण तात्काळ लागू करावे. दुसरे,सर्व मागासवर्गीय महामंडळांचे कर्ज माफ करावेत. तिसरे, मुलींच्या शासकीय वसतिगृहांच्या संख्येत वाढ करावी. चौथे, लहुजी साळवे, अण्णाभाऊ साठे, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, गाडगे महाराज यांच्या प्रतिमा सर्व शासकीय कार्यालयांमध्ये लावण्याचे आदेश जारी करावेत.

अशा स्वरूपाच्या मागण्या शासन दरबारी केलेल्या आढळतात. याचप्रमाणे आंदोलनाची व्यापकता व तीव्रता वाढविण्यासाठी लोकस्वराज्य आंदोलनाने 'पाच हजार आंदोलने' निर्माण करणे, 'गाव तेथे शाखा, घर तिथे आंदोलक' हा उपक्रम राबविण्यासाठी उच्च शिक्षित १०० वक्ते तयार करून विचारांची पेरणी करण्याचा संकल्प संघटनेचा आहे. याकरिता लोकस्वराज्य आंदोलनाचे पहिले अधिवेशन ता. उमरी, जि.नांदेड येथे शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २००८ शुक्रवार रोजी घेण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.बी.एस. वाघमारे (प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, डॉ.बा.आं.म.वि.,औरंगाबाद) हे होते. तर प्रमुख अतिथी डॉ. भगवान वाघमारे (अध्यक्ष ल.सा.क.म., महाराष्ट्र राज्य) हे होते.[३६] या संघटनेने अधिवेशने, मोर्चा या मार्गासह मातंग समुदायाच्या मागण्यांसाठी 'रास्ता रोको' या तंत्राचाही उपयोग केला आहे. उदा : मातंग समाज स्वतंत्र आरक्षणाच्या मागणीसाठी बुधवार, दि. ३०-१२-०८, बुधवार रोजी लहुजी साळवे चौक, इंदिरानगर, रेल्वे गेट क्रं. ०२, धर्माबाद, जि. नांदेड येथे रास्ता रोको, करून मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात व्ही.जी.डोईवाड, विठ्ठलराव शिंदे, भालके रविकिरण, पिंगळे अविनाश, जटाळकर गणेश, राजकिरण वाघमारे, बी.एम. गोणारकर, मधुसूदन बोराळे, वासनीकर बाबूराव (बेल्लूर) संदीप भालके, आनंदा कमलाकर, पिराजी तोडलवार (नायगाव) आदी सहभागी होते.

मराठवाड्यातील आणखीन एक महत्त्वाची संघटना म्हणजे 'मातंग समाजातील परिवर्तनवादी संघटना' होय. ही संघटना परभणी जिल्ह्यातील असून ती परिवर्तनवादी विचारांच्या माध्यमातून समाजाला संघटित करण्याचे कार्य करणारी एक संघटना म्हणून ओळखली जाते. याचप्रमाणे 'मातंग शक्ती महाराष्ट्र' ही संघटनाही कार्यरत आहे. या दोन संघटनांनी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध नामवंत-विचारवंतांना पाचारण करून समाजप्रबोधनाचे कार्य केलेले आहे. उपरोक्त दोन्ही संघटनेत कार्य करणारे कार्यकर्ते पुढीलप्रमाणे आहेत. प्रा. इबतबार कमलेश्वर, क्षीरसागर, उत्तमराव अवचार, एल.एल. क्षीरसागर, प्रा. शंकर कांबळे, राजेश उफाडे, प्रल्हाद भिसे, दत्तराव बसवन्ते, गुलाब मस्के, माधव हातागले आदी हे कार्यकर्ते मातंग समाज ऐक्य विचार मेळावा आयोजित करण्यासाठी परिश्रम घेतात. याच प्रमाणे 'मातंग शक्ती' ही संघटना सुधाकर भालेराव (उदगीर) यांनी स्थापन केली. सन २००४-०९ या पंचवार्षिकमध्ये 'हेर' मतदार संघातून या संघटनेचे उमेदवार म्हणून ते स्वत: उभे होते. तेव्हा त्यांना चौथ्या क्रमांकाची मते मिळाली. (लोकसत्ता, १० नोव्हेंबर २००९: ०६)

ल.सा.वि. परिषद औरंगाबाद या संघटनेने मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण (८ टक्के) मिळावे याकरिता आरक्षण जागृती अभियान डिसेंबर २००८ या कालावधीत

उत्स्फूर्तपणे संपन्न केले. आरक्षणाची महत्त्वपूर्ण भूमिका घेऊन ही संघटना लढत आहे. या परिषदेचे अध्यक्ष तातेराव तोरके, राजू खाजेकर, भागीनाथ काळे, प्रा. बी. डी. खोतकर, कल्पना त्रिभुवन, सुवर्णा साबळे आदी कार्यकर्ते परिश्रम घेतात.

मराठवाड्यातील, अर्थात औरंगाबाद शहरातील पहिली विद्यार्थी संघटना 'क्रांतिगुरू लहुजी साळवे विकास परिषद विद्यार्थी आघाडी' ही होय. या आघाडीचे प्रमुख मच्छिंद्र कांबळे हे असून शहर प्रमुख सुभाष मातंग आहेत. विद्यार्थ्यांच्या हिताचे प्रश्न हाताळण्यासाठी ही संघटना निर्माण झालेली आहे.[३७]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातही लहुजी साळवे विद्यार्थी संघटना स्थापन झाली आहे. ही अलीकडील संघटना म्हणून ओळखली जाते. विद्यापीठ स्तरावरील मातंग समुदायातील विद्यार्थ्यांचे प्रश्न निर्मूलनाच्या दृष्टीने या संघटनेस महत्त्व आहे. तात्पर्य, औरंगाबाद शहरातील विद्यार्थी संघटना व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी संघटना असा फरक पाहावयास मिळतो; पण त्यांचे प्रश्न समान दिसतात. मराठवाड्यातील औरंगाबाद शहरातील 'मातंग मुक्ती सेना' ही एक अलीकडील संघटना असून समाज जागृतीचे प्रयत्न करणारी अन्याय-अत्याचाऱ्यांचे सूक्ष्म निरीक्षण करून न्याय मागणारी संघटना आहे. या संघटनेने तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व सामाजिक न्यायमंत्री चंद्रकांत हंडोरे यांना समुदायाच्या विकासासंदर्भात काही मागण्यांचे निवेदन दिले. यात मुख्यत: पुढील दोन मागण्या करण्यात आलेल्या होत्या.

पहिले,क्रांतिगुरू लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाचा कार्यकाळ एका वर्षाकरिता वाढवावा. दुसरे, जालना नगरपालिकेसमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासमोर अण्णाभाऊ साठेंचा पुतळा बसवावा.[३८]

४. खान्देशातील मातंग समुदायाची संघटना :

महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा भूभाग म्हणजे 'खान्देश' होय. यास 'उत्तर महाराष्ट्र' या नावानेही ओळखले जाते. या भू-भागाचे महत्त्व म्हणजे येथे अहिराणी बोली भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. या भाषेचा उपयोग ग्रामीण भागात अधिकांश आढळतो. खान्देश जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यांनी मिळून बनले आहे. या भागात मराठा, गुजराती, मारवाडी या जाती मोठ्या प्रमाणावर असून दलितांतर्गत महार व चर्मकारांची संख्याही आढळते. पण मातंग समुदाय मोठ्या प्रमाणावर आढळत नाही. जळगाव जिल्ह्यात मातंग समाज मोठ्या संख्येने निदर्शनास येतो. हा समाज अत्यंत गरीब व होतकरू आहे. पण शिक्षणात मागे आहे. त्यामुळे त्यांचे नोकरीतील प्रमाण फार अल्प दिसते. जे सध्या सुशिक्षित आहेत, त्यांना नोकरीसाठी शोधाशोध घेऊनही नोकरी मिळत नाही. मातंग समुदायातील ५ टक्के मुले,मुली शिक्षण घेत आहेत. २१ व्या शतकाकडे देशाने वाटचाल करूनदेखील, महासत्तेच्या उंबरठ्यावर असताना हा समुदाय

दारिद्र्यरेषेखाली जीवन जगतो आहे. अशा एक ना अनेक प्रश्नांमुळे त्रस्त होऊन मार्ग काढण्यासाठी 'मातंग सेवा मंडळ' (रजिस्टर्ड क्र. महा/१२६३/एफ/११९३ जळगाव/दि. ११-५-९०) ही संघटना जळगाव येथे स्थापन झाली. तिचे संस्थापक-सचिव नाना साठे हे आहेत. जळगाव जिल्ह्यात व खान्देशात विधायक स्वरूपाचे कार्य या मंडळाने केलेले आहे ते नोंद घेण्यासारखे आहे. या मंडळाची पहिली महत्त्वपूर्ण भूमिका म्हणजे, जळगाव जिल्ह्यातील 'धरणगाव' हा एक तालुका आहे. सदर तालुक्यात मातंग समाजाची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. अल्प शिक्षणामुळे हा समाज पारंपरिक व्यवसायाकडे अधिक प्रमाणात वळला. आणि मिळेल ते काम करू लागला.

याचाच एक भाग म्हणजे या तालुक्यात नगरपालिकेत साफसफाईचे काम मातंग समुदायातील लोक करतात. सफाई कामगार म्हणूनही सेवा देतात. परंतु प्रशासनाने त्यांची सेवा लक्षात न घेता कायमस्वरूपी नोकरी दिली नाही म्हणून मंडळाने मातंग समाजातील स्त्री-पुरुषांना सफाई कामगार म्हणून कायम करावे याकरिता लढा दिला. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.[३९]

या मंडळाची आणखीन एक महत्त्वाची भूमिका म्हणजे, मातंग समुदाय हा पारंपरिक व्यवसाय करतो. यात बांबूपासून कच्चा माल, सुपडे, टोपले, केरसुणी या वस्तू बनविल्या जातात. तसेच पन्हाळीच्या सालीपासून झाडू, घायपातापासून दोरखंड तयार केला जातो. हा माल तयार करण्यासाठी कमीत कमी १० ते १५ दिवस लागतात. परंतु हा व्यवसाय करण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे भांडवल नसते. अण्णाभाऊ साठे महामंडळाकडून जे कर्ज घेतले जाते, त्यातून वस्तू तर तयार होतात; पण त्यांची विक्री होताना दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे, आधुनिकीकरणात निरनिराळ्या कंपन्यांनी तयार केलेल्या वस्तू उदा.- सूप, टोपली, केरसुणी, दोरखंड बाजारात उपलब्ध झाल्याने त्यास आधुनिक स्पर्श असल्याने त्याची मागणी जास्त आहे. मातंग समुदायांच्या वस्तू पारंपरिक असल्याने त्यांना बाजारभाव नाही. म्हणून मातंग सेवा मंडळाने या संदर्भात आंदोलन केले. शासन दरबारी निवेदन देऊन दोन मुख्य मागण्या केल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत :-

पहिले, महाराष्ट्र शासनाने मातंग समाजातील व्यक्तींना : हातापासून बनविलेल्या मालास विक्रीसाठी स्वातंत्र बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी. दुसरे, मातंग समाजाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विकास महामंडळाकडून घेतलेले कर्ज शासनाने माफ करावे. अशा मागण्यांचा शासन दरबारी पाठपुरावा केल्याचे दिसते.[४०]

'क्रांतिवीर लहुजी साळवे बहुउद्देशीय संस्था' जळगाव यांच्या वतीने (रजिस्टर्ड. क्र. एफ – ४६०४, स्थापना ता. १९-०८-१९९९) राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील यांना मातंग समाजाच्या मागण्यांचे निवेदन दिले. त्यावेळी रमेश नामदेव साठे (सचिव),

प्रा.राजेन्द्र देशमुख, हफिजखान, ज्ञानेश्वर सोनवणे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. या निवेदनातील दोन महत्त्वपूर्ण मागण्या खालीलप्रमाणे आहेत :-

पहिले, जळगाव येथे अण्णाभाऊ साठे स्मारक बनविण्यासाठी जळगाव शहराच्या मध्यभागी अन्यथा शासनाच्या नियमानुसार भूखंड मिळावा. दुसरे, मातंग समुदायामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, सुधारणा होण्यासाठी मातंग समाजाला अ,ब,क,ड अशा वर्गवारीतील आरक्षण द्यावे.

उपरोक्त चर्चेत खान्देशात तीन जिल्हे असून आंदोलनाचे प्रमाण मात्र जळगाव शहरात बव्हंशी आढळते. मातंग सेवा मंडळ, व बहुउद्देशीय संस्थेच्या प्रश्न हाताळण्याच्या सक्रियतेमुळे उत्तर महाराष्ट्रात आंदोलन नेमके काय आहे, त्याची गरज आहे काय या संदर्भात मातंग समुदाय जागरूक होताना दिसतो.

एकंदरीत खान्देशात नामदेवराव मोरे, अशोक पारधे, रवींद्र बावीस्कर, प्रकाश खैरनार (उप-मुख्याध्यापक) संजय अंभोरे, नाना थोरात, डब्ल्यू.वाय. आवारे (धुळे), सुरेश अंभोरे, अरुण बिऱ्हाडे (जळगाव), शंकरराव सोनवणे (भुसावळ), प्रा.अजित कलवले (यावल), रतन भालेराव, दिलीप मोरे (रावेर), बाबूराव खुळे, विजय मस्के (मुक्ताईनगर), लक्ष्मण भालेराव (बोदवड), एकनाथ चंदनशिव (जामनेर), तानाजी जाधव, विजय पवार (पाचोरा), प्रा.एल.एल. कांबळे, रमेश कांबळे (भडगाव), मरसाळे गुरुजी (चाळीसगाव), देवराव भोगे (लायब्ररी असिस्टंट), एस.बी. कांबळे, युवराज थोरात (पारोळा), मगन कांबळे, गांगुर्डे, शाहीर जगदाने, भिवसन निक्से, उत्तम अंभोरे (अंमळनेर), ए.एस. पाचोने (चोपडा), लोटनचित्ते (धरणगाव), मोहन चव्हाण (एरंडोल) इत्यादी कार्यकर्ते समाज प्रबोधनासाठी परिश्रम घेतात. त्यांचे योगदान नोंद घेण्यासारखे आहे. या भागातील मातंगांची संख्या अल्प आहे ; पण खान्देशातील मातंग पुढारी / कार्यकर्ते सामाजिक दृष्टीने कार्य करतात हे महत्त्वाचे आहे.

तात्पर्य, मातंग समुदायातील ज्या काही प्रबळ संघटना आहेत, त्या प. महाराष्ट्र व मरावाड्यात बहुतांश आढळतात. तर विदर्भ हा तिसऱ्या क्रमांकावर असून खान्देशाचा चौथा क्रमांक लागतो. पण कोकणात मात्र संघटना आढळत नाहीत. कारण तेथे समुदायाची संख्या अत्यल्प आहे. उपरोक्त चर्चेतून असे स्पष्ट होते की, आजच्या परिप्रेक्ष्यात मातंग समुदाय आपल्या न्याय्य-हक्कांसाठी आंदोलन करताना व सामाजिक प्रश्नांची मांडणी करताना दिसतो. यातून एका प्रकारची जाणीव प्रगल्भता येताना आढळते.

प्रस्तुत प्रकरणाच्या प्रारंभी संघटना व चळवळीची व्याख्या व अर्थ दिला आहे ; त्यानुसार मातंग संघटना या काही प्रमाणात कार्यरत असताना दिसतात. उदा : सर्व विभागनिहाय संघटनांची मूल्ये व उद्देश हे लोककल्याण हेच आहे. एल.डी.व्हाईटने

म्हटल्याप्रमाणे जबाबदारी हा घटक मानवी हक्क अभियान, महाराष्ट्र युवक परिषद, अण्णाभाऊ साठे फाऊंडेशन, दलित महासंघ आदी संघटनांत आढळून येतात. याचप्रमाणे आपणास काहीच मिळत नाही. हा असंतोष सर्व मातंग संघटनेत आहे. न्याय प्राप्तीकरिता सर्व संघटना अलीकडे क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावणीकरिता संघर्ष व पाठपुरावा करताना दिसतात. हे संघटनेची बदलत्या परिस्थितीनुसार बदलती कार्यपद्धती दर्शविते. म्हणून या संघटना सैद्धांतिक चौकटीत कार्य करतात पण मोठ्या प्रमाणावर दबावगटाची भूमिका व शासनाचे लक्ष वेधताना दिसत नाहीत.

५.६ सामाजिक संघटनेची परिणामकारता व उपयोगिता :

सामाजिक संघटना या विशिष्ट विचारधारेने कार्यरत असतात. त्यांच्या विचारधारेमुळेच ते विशिष्ट कृती करीत असतात. अशा कृतीत ते काही आयुधांचा उपयोग करीत असतात. किंबहुना आयुधांच्या बळावरच ते यशही संपादन करतात. महाराष्ट्रातील हिंदू दलितांच्या (मातंग जात समुदाय) चळवळीने मोर्चे, रास्ता रोको, मेळावे, चिंतन शिबिरे, दबावगट म्हणून कार्य करताना अशा आयुधांच्या बळावर अहिंसक आंदोलने करताना दिसतात. अशा आंदोलनांमुळे सामाजाचा मानसिक स्तर उंचावतो. आंदोलनांमुळेच धाडस वाढते, नेते निर्माण होतात आणि साहित्याची निर्मिती होती. या अनुषंगाने मातंग जाती समुदायाकडे कुठलीच सत्ता, संपत्ती नाही. प्रतिष्ठापासून त्यांना जाणीवपूर्वक दूर ठेवले गेले. म्हणून उपरोक्त घटकांपासून दूर ठेवणाऱ्यांना धडा शिकवला पाहिजे. याकरिता आंदोलन केले पहिजे. आंदोलनाशिवाय परिवर्तन होणार नाही (लहुशक्ती : एप्रिल २००७ : १७-१८) .असा विचार प्रबळ होताना दिसतो. चळवळी या राजकारणापासून अलिप्त असाव्यात असा एक विचारप्रवाह आढळतो. राज्य व राष्ट्रीय पातळीवर सामाजिक आंदोलने करणारे अनेक गट-समूह आहेत. पण त्या सर्व चळवळींना अनुदान देऊन त्यांची मते मिळविण्याची कसब प्रस्थापित राजकीय पक्षांना प्राप्त झालेले आहे (दै.प्रजासत्ताक भारताचा शिल्पकार : ४ नोव्हेंबर २००८:३: नांदेड).

म्हणून आजच्या परिप्रेक्ष्यात हिंदुत्ववादी दलित संघटना असेल वा अन्य संघटना या सर्वांची आयुधे अहिंसक असणे अपरिहार्य व दीर्घकाळ उपयोगात येणारे हवे आहे. पण रणजी गुहांच्या मते, प्रत्येक चळवळीत पर्याय, विचारधारा, कार्यक्रम, नेतृत्व, संघटना अंतर्भूत असतात. मात्र त्यांचे स्वरूप प्रत्येक चळवळीत वेगवेगळे असते.[४१] म्हणून उपयोगात आणावयाच्या आयुधांत कमी-जास्त अंतर असणे स्वाभाविक आहे. पण त्यामुळे आयुधाचे महत्त्व कमी होत नाही. चळवळींची यशस्विता बहुधा त्यावरच अवलंबून असते.

१. संघटनात्मक वर्तन :

संघटनात्मक वर्तन या संकल्पनेचे स्पष्टीकरण अनेक तज्ज्ञ व संशोधकांनी केलेले आहे. कीथ डेव्हिस, न्यू स्ट्रॉम यांनी त्यांच्या *'Human Behaviour at Work' (1985)* या ग्रंथात संघटनात्मक वर्तन या संज्ञेची व्याख्या पुढीलप्रमाणे उद्धृत केली आहे. 'संघटन वर्तन म्हणजे संघटनेतंर्गत माणसे कशी वागतात याचे अध्ययन व अशा ज्ञानाचे अवलंबन होय. ते एक प्रकारे मानवी फायद्यासाठी असलेले मानवी साधन आहे. त्याचा वापर शाळा, शासन व सेवा अशा सर्व प्रकारच्या संघटनांतील माणसांच्या वर्तनासंबंधात होतो.' [४२]

उपरोक्त विधानातून संघटनात्मक वर्तन हे अत्यंत आव्हानात्मक व गुंतागुंतीचे शास्त्र बनले आहे याची जाणीव होते. संघटना व संस्था ही परिस्थितीजन्य असते. म्हणून मानवी वर्तन तसेच संघटना या दोन्ही गोष्टी परिस्थितीनुसार एकमेकांवर आघात-प्रत्याघात करीत असतात. यातूनच अंतर्गत द्वंद्व होत असते. कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव हा भिन्न-भिन्न स्वरूपाचा असतो. आजच्या परिप्रेक्ष्यात संघटना नामशेष होण्याचे बहुधा हे एक कारण असू शकेल. म्हणून व्यक्तिगत उद्दिष्टे व संघटनेची उद्दिष्टे जुळली तर संघटना कार्यक्षम ठरते. साधारणत: सर्व लोक एकाच प्रकारचे व्यवहार करीत नाहीत. त्यास स्वभाव, व्यक्तित्व व सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी कारणीभूत आहे. एकंदरीत व्यवहाराचे प्रात्यक्षिक–गत्यात्मक व्यवहार *(Perceptual-Motor Behaviour),* सूचना संसाधन व्यवहार, सतर्कता व्यवहार *(Vigilance Behaviour)* आदी प्रकार आढळतात.[४३] मूलत: संघटनात्मक वर्तन हे संघटना, व्यक्ती व समूह अशा त्रिस्तरीय वर्तन वैचित्र्यावरून ठरते. कोणताही संघटनात्मक वर्तन नमुना हा अंतिमत: संघटनात्मक परिणामकारकतेला बळकटी आणणारा असतो. संघटन वर्तन नमुना पुढील आकृतीतून स्पष्ट होईल.



उपरोक आकृतीतून असे स्पष्ट होते की, त्रिस्तरीय वर्तन दुवे हे संघटनात्मक परिणामकारकतेला कशाप्रकारे वृद्धिंगत करतात हे दिसून येईल. यातील एखादा घटक सोडून अध्ययन करता येत नाही. आजच्या परिप्रेक्ष्यात उपरोक्त विचार सर्व सामाजिक संघटनांना उपयुक्त ठरणारा आहे. तात्पर्य, 'संघटनात्मक वर्तन' या विषयाचे महत्त्व आज वाढताना दिसते. हिंदू दलितांचे संघटन म्हणून मातंग जाते संघटनेचा अभ्यास करताना असे आढळते की, व्यक्तिगत वर्तनामुळे काही संघटनांना वर्तनातील मतभेदांमुळे 'लहुजी सेना' (व्ही.जी. रेड्डी) ही आक्रमक संघटना मराठवाड्याच्या स्तरावर मागे राहिली. अर्थात, तिची कार्यमर्यादाही मराठवाड्यातच सर्वाधिक होती. याचप्रमाणे लहुजी साळवे कर्मचारी संघटना (ल.सा.क.म.) ही मूलतः कर्मचारी केंद्रित असल्याने ती खान्देशात संघटनात्मक पातळीवर मर्यादित दिसते. यामागे कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर अभाव हे एक कारण असू शकेल.

५.७ संघटना, चळवळीतील उणीवा :

उपरोक्त चर्चेत आपण हिंदू दलितांच्या संघटना अर्थात, मातंग जातीच्या संघटनांची विभागवारपणे चर्चा केलेली आहे. संघटनेची उद्दिष्टे, स्थापना वर्ष, भूमिका, मर्यादा या घटकांचा चिकित्सक आढावा घेतला आहे. या संघटनांची भूमिका समाजहिताची वाटते. विशिष्ट कार्यक्रमांच्या आधारावर संघटना कार्यमग्न असताना दिसतात. पण आजच्या परिप्रेक्ष्यात संघटनांची भूमिका पक्षीय चौकटीत बंदिस्त होत असून त्यांच्या मर्यादाही लक्षात येतात; आणि संघटनेतील उणिवा व पेचप्रसंगही अध्ययनाच्या दृष्टीने पुढे येतात. यातील महत्वाच्या बाबी अशा की, १) हिंदू दलितांच्या चळवळी निव्वळ जातींच्या प्रश्नावरच लढा देत नसून काही संघटना मागासवर्गीयांच्या हितांचे प्रश्न चर्चेला आणतात. २) महार समुदायाप्रमाणे मातंग चळवळी या गाणे वाजवणे *Revolutionary Song,* सार्वजनिक संस्कृती जपण्याचे ठिकाण बांधणे *Religious ldentity,* प्रस्थापित करणे इत्यादी कृती करताना दिसत नाहीत. पण महार समुदाय अशा कृतीतून सामाजिक प्रगल्भता आणते. नोंद घेण्यासारख्या आहे. हरीश वानखेडे या अभ्यासकाच्या मते, हीच महाराष्ट्रातील दलित बुद्धिस्ट चळवळीची मर्यादा आहे.[४४]

एकंदरीत सन १९८० चे दशक एका अर्थाने पारंपरिक चळवळीच्या अस्ताचे दशक मानावे लागेल. या दशकापासून विविध क्षेत्रांत उदयाला आलेली आंदोलने वा चळवळी साकल्यलक्षी *Holistic* न राहता त्या विशिष्ट उद्दिष्टलक्षी *Specific* स्वरूपात पुढे आल्या. याच अर्थाने महाराष्ट्रात सन १९६० च्या दशकानंतर झालेल्या मातंग समाजाच्या चळवळी सर्वार्थाने संकुचित होत्या. त्या चळवळींची ध्येय; कार्यक्षेत्रे, प्रभाव मर्यादित घेता पारंपरिक व्यवसाय सोडून नवव्यवसाय समाजाने स्वीकारावा, अशा

स्वरूपाचे समाज परिवर्तन हे त्या चळवळीचे ध्येय होते. परंतु सन १९८० च्या दशकापासून उदयाला आलेल्या सामाजिक संघटनांची ध्येये, कार्यक्षेत्रे, विचारप्रणाली, सामाजिक पाया व्यापक असून आंदोलनाचे तंत्र, साधने अभिनव स्वरूपाची आहेत. नागरी सत्ता बळकट करणे हे त्यांचे लक्ष्य आहे. दलित आंदोलन हे समतामूलक, आत्मसन्मानयुक्त व अस्पृश्यरहित समाज निर्माणास प्रतिबद्ध आहे.[४५] पण अशा स्वरूपाची भूमिका असूनही हिंदू दलितांच्या संघटनांत काही उणीवा नजरेस पडतात. त्या खालीलप्रमाणे सांगता येतील -

पहिले, महार समुदायातील दलित चळवळींनी सत्ताधारी वर्गावर आपल्या न्याय्य हक्कांसंदर्भात यशस्वीरीत्या दबाव आणला आहे. त्यातून सामाजिक, राजकीय लाभ प्राप्त करून घेतले आहेत. पण मातंगांच्या चळवळींनी यशस्वी दबावगट म्हणून (अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ वगळता) कार्य केलेले नाही. किंबहुना आरक्षणाची एकमुखी मागणी असतानाही शासनावर विशेष प्रभाव पाडू शकल्या नाहीत. दुसरे, हिंदू दलितांच्या संघटनांचे आजचे स्वरूप मर्यादित असल्याने त्यांच्यात मजबूत भूमिका आढळत नाही. ही असंघटित ऊर्जा प्रस्थापित व्यवस्थेच्या घटक पक्षांकडे आकर्षित झालेली आहे. तिसरे, महाराष्ट्रातील अनेक मातंग संघटना या प्रबळ असून त्या अराजकीय स्वरूपाच्या आहेत. म्हणून अशा संघटना जातीयवादी व धर्मवादाच्या राजकारणास विरोध करतात. पण काही संघटना राजकीय दिसतात. (उदा. दलित स्वयंसेवक संघ, १९७७) म्हणून त्यांना विशिष्ट भूमिका घेतांना मर्यादा येतात. तात्पर्य, संघटन, उद्देश, कार्यपद्धती यातही मतभेद आढळतात. चौथे, महाराष्ट्र मातंग समाजाच्या संघटनेचे प्रभावक्षेत्र व कार्य मर्यादित असल्याने त्यांचा कार्यक्रम व आंदोलने पक्ष वर्तुळाचा परीघ ओलांडत नाहीत. एवढी ती संकुचित पायावर उभी असतात.

पाचवे, आजच्या परिप्रेक्ष्यातील चळवळी एक प्रश्नलक्ष्यी नसल्याने अनेक प्रश्नांभोवती केंद्रित झालेल्या दिसतात. परिणामतः त्यांच्यात प्रश्नांवरून मतभेदासह, समुदायाच्या उत्थानाकरिता एकत्रित लढा देण्याचा प्रश्न निर्माण होतो. तात्पर्य, प्रत्येक संघटना आपापल्या स्तरावर लढा देते. त्यामुळे त्यांचा परिणाम शासनावर पडताना दिसत नाही. कारण प्रत्येक संघटनेच्या युक्त्या, हातमिळवणी, ध्येय भिन्न असते. सहावे, आजच्या हिंदू दलितांच्या संघटना केवळ निदर्शने, आंदोलनांच्या बळावर आकाराने मोठ्या होताना दिसतात, त्याबळावर काही काळ जिवंतही राहतात. पण ठोस अशा सामाजिक कर्तृत्वावर बाळसेदार होताना मात्र दिसत नाहीत. सातवे, सामाजिक उत्कर्षासाठी संघटनबळ लावण्याऐवजी राजकीय आराखडे मांडण्यासाठी आणि मोडण्यासाठी *Play Ground* प्रमाणे संघटना झिजत आहेत. याचा लाभ मात्र त्यांना अंशतः प्राप्त होताना दिसतो. आठवे, मातंग समुदायाची चळवळ ही जनसामान्यांच्या सहभागामुळे जिवंत राहिली आहे. पण बुद्धिजीवी, पुढारी, कार्यकर्ते हे विशिष्ट अंतर ठेवून स्वार्थी व संकुचित हेतूने सहभागी होतात.

तात्पर्य, हिंदू दलित संघटनांच्या सामाजिक कल्याणासंदर्भात अधिकांश विचार करावा आणि परस्पर हेवेदावे सोडून समन्वयातून सक्रियपणे कार्य संपन्न करावे ही आजच्या परिप्रेक्ष्यातील गरज आहे. तेव्हा कुठे आपणास समकालीन उणीवावर मात करता येईल. गतिशील व ध्येयनिष्ठ संघटनेचे काळाबरोबर पुढे जाणे हे एक प्रमुख उद्दिष्ट असते. अशा वाटचालीत सर्व संघटनांना संकटांचा सामना करावा लागतो. संख्यात्मक विचार जेव्हा होऊ लागतो, तेव्हा गुणवत्तेची त्रुटी जाणवू लागते. यांचे जर नियंत्रण केले नाही किंवा त्यात सुधारणा केली नाही, तर भावी वाटचाल खुंटण्याचा धोका निर्माण होतो.[४६] म्हणून ज्या संघटनेला आपल्या मूळ उद्दिष्टांचा कधीच विसर पडत नाही आणि कोणते लक्ष्य गाठायचे याचे सदैव स्मरण असते, अशी संघटना त्रुटींचा विचार करते आणि त्या सुधारून त्यावर विजय मिळविते. अशा स्वरूपाची वाटचाल हिंदू दलित संघटनांनी करावी. तेव्हाच पुढे समग्र परिवर्तन शक्य आहे.

५.८ सारांश (Conclusion) :

प्रस्तुत प्रकरणात हिंदू दलितांचे संघटन नेमके काय आहे, या संदर्भाचे अध्ययन करीत असताना त्याचे तीन भागांत विभाजन केलेले आहे. पहिल्या भागात आपण संघटना, जातीय संघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, चळवळींचा प्रवास व त्याचे स्वरूप यांचे अध्ययन केलेले आहे. कारण हिंदू दलितांचे संघटन समजून घेण्यापूर्वी ऐतिहासिक आढावा वा चळवळीचा प्रवास नेमका काय आहे, याचे नीटपणे आकलन करणे अपरिहार्य होते. यातून हिंदू दलितांना संघटना का करावी लागली आणि संघटनेचे महत्त्व काय आहे ? या संदर्भाची जाणीव होण्यास मदत मिळाली. म्हणून ही पूर्वपीठिका अध्ययनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

मातंग समाज व आंबेडकरी चळवळ यांचा आंतरसंबंध शोधण्याचा प्रयत्न झाला आहे. यावरून हिंदू दलितांच्या संघटना कोणत्या आधारावर कार्यरत आहेत याची माहिती स्पष्ट होते. प्रस्तुत प्रकरणाच्या उद्दिष्टांनुसार हिंदू दलित संघटनेच्या मागण्या या रास्त व न्यायपूर्ण वाटतात हे उपरोक्त चर्चेतून स्पष्ट होते. याचप्रमाणे संघटना, चळवळीसंदर्भात विविध अभ्यासकांची भूमिका व दृष्टिकोनांचे अध्ययन करण्यात आलेले आहे. त्यामुळे संघटनासंदर्भात आपलाही दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. तसेच सन १९८० च्या दशकापासून नवीन प्रश्न घेऊन उदयाला आलेली नवसामाजिक चळवळ यासंदर्भात संक्षिप्त पण अध्ययनाच्या दृष्टीने उपयुक्त अशी चर्चा करण्यात आले आहे. तसेच संघटनेने उपयोगात आणलेली आयुधे व संघटनेतील वर्तन या संज्ञेचेही अध्ययन करण्यावर दुसऱ्या भागात भर देण्यात आलेला आहे.

तिसऱ्या भागात प्रामुख्याने विषयाच्या मुळात जाण्याचा प्रयत्न झाला. प्रदेशवार मातंग जातीगटांचे अध्ययन करण्यात आले. त्यात संघटनेचा हेतू, कार्यपद्धती, मागण्या या संदर्भाची चर्चा करण्यात आली आहे. याकरिता अनेक निमंत्रण पत्रिका, पॉम्प्लेट्सचा, प्रेसनोटचा आधार घेण्यात आला आहे. याचप्रमाणे सामाजिक संघटनांतील उणीवा काय आहेत, ते व्यक्तिगत अध्ययनाच्या दृष्टीने अभ्यासण्यात आले. ते पारदर्शक व तटस्थ स्वरूपाचे आहे.

संदर्भ व तळटीपा *(References and Foot Notes) :*

१) शहा घनश्याम, प्राची चिकटे (अनुवाद), *भारतातील सामाजिक चळवळी,* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८, प्रस्तावनेतील संदर्भ.

२) *एनसायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्स,* डायमंड सामाजिक ज्ञानकोश, पुणे, २००७, पृष्ठ.क्र. १५६८-१५६९ .

3) Gupta Rajendra, *Public Administration*, Vital Publication, Jaipur, 2007, P. 130.

4) *समाज प्रबोधन पत्रिका,* मार्च-एप्रिल १९८१, पृष्ठ.क्र.११८.
दलित चळवळीत सहभागी होणारी बहुसंख्य जनता मध्यवर्गीय नाही, हे दीपंकर गुप्ताही मान्य करतील. मग असे असतानाही दलित समाजाला मध्यमवर्गीय चळवळीमागून का फटकारावे लागते? एकदा हा प्रश्न उपस्थित करून दलित चळवळ सोडून इतर चळवळींचा वर्गीय आशय शोधण्याचा जर कोणी प्रयत्न केला, तर महाराष्ट्रातील दलितांपुढे दुसऱ्या कोणत्याही चळवळींचा ठोस पर्याय आजपर्यंत तरी उभा नव्हता असा निष्कर्षही कदाचित कोणी काढू शकेल. इतर चळवळींच्या अशा मापनानंतर दलित चळवळींचे 'मध्यमवर्गीय' असे मापन एकांगी व भडक वाटणार नाही.

5) Andre Beteille, *The Backward Classes and the New Social Order,* Oxford University Press, Delhi, 1981-, P. 08

6) Pawar Vasant Baburao, *Ph.D. Thesis* Submitted to Dr.B.A.M.U., Aurangabad, December-2004, P.42.

7) Ibid, P. 42.

८) पूर्वोक्त, शहा घनश्याम (अनुवाद-चिकटे प्राची), *भारतातील सामाजिक चळवळी,* पृष्ठ.क्र.२७-२८.

9) Waghmare B.S., *The Other Dalit Voice in Indian Politics,* Kalpana Publication, Nanded, 1998, P. 87.

१०) गाटाळ एस.एस., *महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचे बदलते स्वरूप व प्रवाह,* पीएच. डी., प्रबंध, डॉ. बा.आं.म.वि.औरंगाबाद. १९९५, पृष्ठ.क्र.३९३-४००.

11) Wankhede Harish, *EPW*, February . 09, 2008, P. 51.

१२) किरवले कृष्णा, *दलित चळवळ आणि साहित्य,* प्रतिमा प्रकाशन, पुणे, जून १९९६, पृष्ठ.क्र.२३-३३.

13) Guru Gopal , *EPW,* 3 April 1993, P. 570

14) Palshikar Suhas, *EPW*, June 10, 1995, pp. 1371-72.

१५) भोळे भा.ल, किशोर बेडकीहाळ (संपा.), *बदलता महाराष्ट्र,* डॉ. आंबेडकर अकादमी, सातारा, २६ डिसेंबर २००३, पृष्ठ.क्र.२६३.

16) Guru Gopal, *EPW,* January. 14, 1995, P.101

17) Op. Cit, Palshikar Suhas, P. 1371.

18) Op.Cit, Wankhede Harish, P. 50.

१९) डोळस अविनाश, *आंबेडकरी चळवळ : परिवर्तनाचे संदर्भ,* सुगावा प्रकाशन, पुणे, ९ ऑगस्ट १९९५, पृष्ठ.क्र.६०.

२०) कवठेकर बाळकृष्ण, *समाज प्रबोधन पत्रिका,* जुलै-डिसेंबर १९८२, पुणे, पृष्ठ.क्र. २४२.

२१) गोपले कुसुमताई (प्रकाशक), *दलित मातंग समाज चळवळ,* १ ऑगस्ट २००८, मुंबई, पृष्ठ.क्र.५१.

२२) दाभोळकर नरेंद्र, *साधना,* १ मे १९८५, पुणे, पृष्ठ.क्र.२१.

२३) सोमवंशी बी.सी. (संपा.), *महाराष्ट्रातील मांग,* आनंद प्रकाशन, औरंगाबाद, २००६, पृष्ठ.क्र.१२६.

२४) *बामसेफ प्रसिद्धिपत्रक,* बामसेफ युनिट, खान्देश विभाग, अंमळनेर, राष्ट्रीय मूलनिवासी संघ, ४ -५ ऑक्टोबर २००८

२५) Oommen T.K., *Nation, Civil Society and Social Movement,* Sage Pub.,Delhi, 2004, P. 184

२६) दै. *सामना,* ५ ऑगस्ट २००८, शेवटचे पान

२७) *मातंग समाज अभ्यास आयोग अहवाल,* महाराष्ट्र शासन, ३१ ऑगस्ट २००८, पृष्ठ.क्र.२४४.

२८) *संघटन निमंत्रण पत्रिका* (ल.सा.क.म.), शनिवार २२ जुलै २००७, औरंगाबाद.

२९) *संघटन निमंत्रण पत्रिका* (ल.सा.क.म), २७ जुलै २००८, गुलमोहर कॉलनी, सिडको, औरंगाबाद.

३०) *संघटन निमंत्रण पत्रिका* (ल.सा.क.म.), १३ जानेवारी २००८, नवीन सिडको, औरंगाबाद.

३१) *पॉम्प्लेट,* ल.सा.क.म., शाखा - जळगाव जिल्हा, रविवार १८ फेब्रुवारी २००७.

३२) *दै.लोकमत,* ८ सप्टेंबर २००८, पुरवणी, औरंगाबाद.

३३) दै. *लोकमत,* २५ ऑक्टोबर २००८, औरंगाबाद, पृष्ठ.क्र.०२.

३४) दै. *लोकमत,* १३ जून २००८, नांदेड आवृत्ती.

३५) *पॉम्प्लेट,* प्रकाशक - मा. वामनभाई काळे, जिल्हा सचिव, फकिरा ब्रिगेड, औरंगाबाद, सप्टेंबर २००८.

३६) *पॉम्प्लेट,* प्रकाशक - लोकस्वराज्य आंदोलन, नांदेड जिल्हा, नोव्हेंबर २००८.

३७) दै. *लोकमत,* २९ सप्टेंबर २००८, औरंगाबाद, पृष्ठ.क्र.०२.

३८) दै.*सकाळ,* रविवार, २१ सप्टेंबर २००८, औरंगाबाद शहर, पृष्ठ.क्र.०४.

३९) *मातंग सेवा मंडळाचे निवेदनपत्र,* दि. ८-०६-०४, जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव.

४०) *मातंग सेवा मंडळाने मुख्यमंत्र्यास दिलेले निवेदन,* दि. ३१-०५-०४.

४१) पूर्वोक्त, शहा घनश्याम, पृष्ठ.क्र.७-८ .

समाजाच्या कोणत्याही थरात मोठ्या प्रमाणावर सामूहिक बदल घडविण्यासाठी साम, दाम, दंड, भेद असे कोणतेही धोरण स्वीकारण्याची तयारी ठेवून केलेले काम म्हणजे 'चळवळ' असे म्हणता येईल. या चळवळीला हिंसा व कायद्याचे बंधन असू शकत नाही. स्वप्न वाटावी अशी समाजरचना करण्यासाठी क्रांती करणे हे या चळवळीचे स्वरूप, हे या चळवळकर्त्यांचे उद्दिष्ट असते. म्हणूनच सामाजिक चळवळीचे स्वरूप हे इतिहासातल्या चळवळीपेक्षा खूपच वेगळे असते. चळवळींवर परिणाम करणाऱ्या व्यक्तींच्या गुणांना म्हणूनच जरा अधिक व विशिष्ट महत्त्व प्राप्त झालेले असते.

४२) *एनसायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस,* डायमंड सामाजिक ज्ञानकोश, पुणे, २००७, पृष्ठ.क्र.१५७०-१५७१

४३) कपूर सुदर्शनकुमार, *प्रबंध परिभाषा कोश,* राजकमल प्रकाशन, दिल्ली, २००८, पृष्ठ.क्र.८८-८९

४४) Op.Cit, Wankhede Harish, P. 52.

४५) दुबे अभयकुमार (संपा.), *आधुनिकता के आईने में दलित,* वाणी प्रकाशन, दिल्ली, द्वितीय आवृत्ती २००५, पृष्ठ. क्र.१९६-१९८.

दसवी से तेरहवी सदी के बीच पूरे भारतीय उपमहाद्वीप में भक्ति आंदोलन के प्रसार से हिंदू धर्म को बड़ा बल मिला । उत्तर में रामानंद और रैदास, पूर्व में चैतन्य और चंडीदास, पश्चिम में चोखामेला, तुकाराम और नरसीं मेहता और दक्षिण में निंबांरका और बसव इस आंदोलन के प्रमुख हस्ताक्षर थे । ये संत द्विज जातियों से भी आये थे और दलित जातियों से भी। इन सभी ने जातिगत भेदभाव का विरोध करते हुए ईश्वर की निगाह में सभी के समान होने का दावा किया । इन संतों द्वारा रचे गए भजनों ने निचली जातियों और अछूतों को मोक्ष का भक्ति-मार्ग दिखाया ।

४६) *मनोगत,* १५ फेब्रुवारी २००५, मुंबई, पृष्ठ.क्र.०४.

---०००---